सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ७० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ५ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## पंतप्रधान मोदींना श्रीलंकेचा सर्वोच्च सन्मान

### दोन्ही देशांमध्ये संरक्षणासह महत्वाचे करार : श्रीलंकेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना श्रीलंका मित्र विभूषण पुरस्काराने केले सन्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५कोलंबो**

पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन दिवसांच्या श्रीलंका दौऱ्यावर आहेत. २०१९ नंतर पहिल्यांदात पीएम मोदी श्रीलंकेला गेले आहेत.श्रीलंकेने त्यांचे जोरदार स्वागत केले. श्रीलंकेच्या राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके यांनी पंतप्रधान मोदींना श्रीलंका मित्र विभूषणाया हा सर्वोच्च गैर-नागरी सन्मान प्रदान केला.

या सन्मानानंतर पंतप्रधान मोदी यांनी 'हा १४० कोटी भारतीयांसाठी सन्मान असल्याचे म्हटले आहे . पीएम मोदींनी श्रीलंकेचे राष्ट्रपती, सरकार आणि जनतेचे आभार मानले आहेत.

मित्र विभूषणय हा श्रीलंकेतील सर्वोच्च बिगर-नागरी सन्मान आहे. हा सन्मान परदेशी मान्यवरांना दिला जातो. श्रीलंकेशी मैत्रीपूर्ण संबंध असलेल्या राष्ट्रप्रमुखांना श्रीलंका सरकार हे पुरस्कार देते. या पुरस्कारात रौप्य पदक आणि प्रशस्तिपत्र दिले जाते.

हे पदक श्रीलंकेच्या नऊ रत्नांनी सजवले आहे. यात चंद्र, सूर्य, पृथ्वी आणि कमळाच्या पाकळ्या बनवलेल्या आहेत.



पदकावर पुन कलसा कोरलेले आहे. ते भाताने भरलेले भांडे असते. हे समृद्धी आणि नूतनीकरणाचे प्रतीक मानले जाते. पदकावरील सूर्य आणि चंद्र हे भारत आणि श्रीलंकेतील शाश्वत संबंधांचे प्रतिनिधित्व करतात. हा पुरस्कार २००८ मध्ये श्रीलंकेचे तत्कालीन राष्ट्रपती महिंदा राजपक्षे यांनी सुरू केला होता.शनिवारी श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके आणि पंतप्रधान मोदी यांच्यात प्रतिनिधीमंडळ स्तरावरील चर्चा झाली. दोन्ही देशांमध्ये सात करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. भारत आणि श्रीलंका यांच्यात संरक्षण भागीदारी करार झाला. दोन्ही नेत्यांनी करारावर स्वाक्षरी केली. या बैठकीत परराष्ट्र मंत्री एस जयशंकर, परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री आणि इतर अधिकारी उपस्थित होते.दोन्ही देशांमध्ये त्रिंकोमालीला ऊर्जा केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी एक करारही झाला. दरम्यान, पंतप्रधान मोदी आणि राष्ट्रपती दिसानायके यांनी समपूर सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन केले. भारत आणि श्रीलंकेने श्रीलंकेला बहु-क्षेत्रीय अनुदान सहाय्य देण्यावरही सहमती दर्शविली आहे.

दुसरीकडे, भारत, संयुक्त अरब अमिराती आणि श्रीलंका यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांच्या उपस्थितीत त्रिपक्षीय सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

## पुन्हा राजकीय भूकंप! पुन्हा ऑपरेशन टायगर?

### 'ठाकरेंचे सहा शिलेदार वेटींगवर'; उदय सामंतांचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

राज्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून ऑपरेशन टायगर सुरू आहे. यामधून अख्ख्या राज्यात महत्वाचे नेते फोडण्यात आले आहेत. नुकताच कोकण आणि पुण्यात ऑपरेशन टायगर यशस्वी झाले आहे. यामुळे सर्वाधिक नुकसान ठाकरे गटाचे झाले असून कोकणात ठाकरे गटाला मोठं खिंडार पडले आहे. दरम्यान आता पुन्हा एकदा ऑपरेशन टायगर सक्रीय केलं जाईल असे संकेत शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी शनिवारी (ता.५) दिले आहेत. त्यांनी हे संकेत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतल्यानंतर पत्रकारांशी बोलताना दिले आहेत.




दरम्यान राज ठाकरे आणि उदय सामंत यांच्या भेटीत नेमकी काय चर्चा झाली याची उत्सुकता सर्वांना लागली असतानाच त्यांनी ठाकरे गटात पुन्हा भूकंप होणार असल्याचा दावा केला आहे. यामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा राजकीय भूकंप होणार असल्याच्या चर्चांना उत आला आहे.

यावेळी सामंत यांनी ठाकरे गटातील अनेक नेते अस्वस्थ असून ते आजही आमच्या संपर्कात आहेत. आमचे नेते एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात ते आहेत. याच्या आधी आम्ही पाच खासदारांचा आकडा दिला होता. ते आलेत. आता सहा नेते आमच्या संपर्कात असून ते वेटिंगवर आहेत. काही दिवसात त्यांचा पक्षप्रवेश होईल, असाही दावा सामंत यांनी केलाय.

## महाराष्ट्रातल्या मोठ्या वक्फ घोटाळ्यात काँग्रेसचे बडे नेते; मुख्यमंत्री फडणवीसांनी दिले कारवाईचे संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

शुक्रवारी सकाळी संसदेत जोरदार चर्चेनंतर वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यात आले. या विधेयकावर लोकसभा आणि राज्यसभेत जोरदार चर्चा झाली. त्यानंतर बहुमताने वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यात आलं. त्यानंतर आता हे विधेयक राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठण्यात येणार आहे. त्यानंतर याचे कायद्यात रुपांतर होईल. दुसरीकडे, महाराष्ट्रात मोठा वक्फ जमीन घोटाळा झाला असून यासंदर्भात आम्ही काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांवर कारवाई करू, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

गुरुवारी लोकसभेनंतर राज्यसभेतही बहुमताने वक्फ दुरूस्ती विधेयक मंजूर करण्यात आलं. लोकसभेत या विधेयकाच्या बाजूने २८८ मते पडली तर विरोधात २३२ एवढी मतं पडली. अल्पसंख्याक कल्याण मंत्री किरेन रिजिजू यांनी लोकसभेत हे विधेयक मांडले होते. एआयएमआयएम आणि काँग्रेसच्या खासदारांनी वक्फ दुरुस्ती विधेयकाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. हे घटनात्मक तरतुदींच्या विरोधात असल्याचे म्हणत सभागृहातील हा लढा आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. या विधेयकाविरोधात अनेक संघटना रस्त्यावर उतरून आंदोलनही करत आहेत. दुसरीकडे, महाराष्ट्रातल्या वक्फ घोटाळ्यावर महाराष्ट्र सरकार कारवाई करणार असल्याचे द हिंदूला दिलेल्या मुलाखतीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

२००० ते २०१४ दरम्यान महाराष्ट्रात झालेल्या मोठ्या वक्फ जमीन घोटाळ्यावर महाराष्ट्र सरकार लवकरच कारवाई करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. वक्फ




दुरुस्ती विधेयकाचा हिंदुत्वाशी काहीही संबंध नाही. वक्फचे दुरुस्ती विधेयक लोकशाहीवादी, समाजवादी प्रजासत्ताक भारताच्या घटनात्मक भावनेशी सुसंगत असून समाजाच्या फायद्यासाठी हे विधेयक मंजूर करण्याचा निर्णय ऐतिहासिक असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. जर मालमत्ता अल्लाहच्या नावावर असेल तर ती पारदर्शक असली पाहिजे आणि ती लोकांच्या हितासाठी वापरली जावी, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

संपूर्ण वक्फची जमीन काँग्रेसने बळकावली आहे. २००० ते २०१४ या काळात मोठा घोटाळा झाला. काँग्रेसच्या सर्व बड्या नेत्यांची त्यात नावे होती. मी विधानसभेतही हा मुद्दा मांडला होता. न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. समितीने ही जमीन या नेत्यांनी बळकावल्याचा अहवाल दिला होता. आता या प्रकरणी आम्ही कारवाई करणार आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.दरम्यान, या घोटाळ्यात सहभागी असलेल्या काँग्रेस नेत्यांच्या नावांबद्दल विचारले असता, मुख्यमंत्री फडणवीस यांनी नावे आठवत नाहीत, परंतु अनेक प्रमुख नेत्यांची नावे होती, असं म्हटलं.

## भूमी-अभिलेख सेवा ऑनलाइन; चंद्रशेखर बावनकुळे यांचे हस्ते उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५नागपूर**

भूमी - अभिलेख विभागाच्या सर्व सेवा भू-प्रमाण केंद्रामार्फत आजपासून ऑनलाईन उपलब्ध झाल्या आहेत. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवार (ता.४) ला ३० भू-प्रमाण ऑनालाईन सेवेचे उद्घाटन केले. ही सेवा राज्यातील सर्व कार्यालयांमध्ये सुरू झाली आहे.

जिल्ह्यातील नगर भूमापन अधिकारी वर्ग १ कार्यालयात हा कार्यक्रम जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख भूषण मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. भू-प्रमाण केंद्राच्या ऑनलाईन सुविधांमध्ये नागरिकांकरिता जागेचे मोजणी अर्ज, फेरफार अर्ज, वारस प्रकरणे, ऑनलाईन पद्धतीने भरल्याची तसेच मिळकत पत्रिका काढणे, सातबारा उतारा काढणे व फेरफार उतारा सुलभ पद्धतीने पुरविण्याची सुविधा या केंद्रामार्फत आजपासून उपलब्ध झाली आहे.

या सुविधेचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन जिल्हा अधिकक्षक भूमी अभिलेख संलग्न उपसंचालक



भूमी-अभिलेख प्रदेश नागपूरचे भूषण मोहिते, नगर भूमापन अधिकारी क्र.१ चे प्रशांत हांडे यांनी केले आहे.जिल्ह्यातील नगर भूमापन अधिकारी वर्ग १ कार्यालयात हा कार्यक्रम जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख भूषण मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. भू-प्रमाण केंद्राच्या ऑनलाईन सुविधांमध्ये नागरिकांकरिता जागेचे मोजणी अर्ज, फेरफार अर्ज, वारस प्रकरणे, ऑनलाईन पद्धतीने भरल्याची तसेच मिळकत पत्रिका काढणे, सातबारा उतारा काढणे व फेरफार उतारा सुलभ पद्धतीने पुरविण्याची सुविधा या केंद्रामार्फत आजपासून उपलब्ध झाली आहे.या सुविधेचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन जिल्हा अधिकक्षक भूमी अभिलेख संलग्न उपसंचालक भूमी-अभिलेख प्रदेश नागपूरचे भूषण मोहिते, नगर भूमापन अधिकारी क्र.१ चे प्रशांत हांडे यांनी केले आहे.या कार्यालयात भू-प्रमाण केंद्राची संकल्पना भूमी अभिलेख विभागाचे उपसंचालक विष्णू शिंदि यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली आहे. यासाठी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख अभय जोशी यांनी सहकार्य केले.या उपक्रमाबद्दल प्रशांत हांडे यांनी प्रस्ताविकात या केंद्राच्या दैनंदिन कामाबाबत प्रास्ताविकात माहिती दिली. यावेळी नगर अधिकारी कार्यालयाचे उपअधिक्षक भूमि अभिलेख सतीश पवार तसेच ग्रामीणच्या उपअधिक्षक दीपाली सोनसरे यावेळी उपस्थित होते.

## माझ्यासोबत लग्न करण्यासाठी २० कोटींची ऑफर होती; करुणा मुंडेंचा धक्कादायक आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५बीड**

मला प्रेमात अकडवून लग्न करणाऱ्याला दोन कोटी रुपयांची ऑफर देण्यात आलेली होती, असा धक्कादायक आरोप करुणा मुंडे यांनी केला आहे. धनंजय मुंडे आणि त्यांचे दलाल लोक कुणालातरी राजी करण्यासाठी दलाली करीत होते, असं म्हणत करुणा मुंडेंनी त्या कथित दलालांची नावंदेखील घेतली आहेत.करुणा मुंडे म्हणाल्या की, राज घनवट, पुरुषोत्तम केंद्रे, तेजस ठक्कर हे धनंजय मुंडेंसाठी दलाली करतात. मला प्रेमात अडकवून लग्न करणाऱ्याला २० कोटी रुपये हेच लोक देणार होते. ही दलाल टीम धनंजय मुंडेंना मुली पुरवतात आणि दारुही पुरवतात.करुणा मुंडे पुढे म्हणाल्या की, घनवट, ठक्कर आणि केंद्रे या दलालांमुळे धनंजय मुंडेंवर घरात बसण्याची वेळ आलेली आहे. २७ वर्षे मी धनंजय मुंडेचा मुलासारखा सांभाळ केला, पतीसारखं नाही



मुलासारखं सांभाळलं आहे. आज त्यानेच मला रस्त्यावर आणलं. आज केवळ मी त्याची गाडी आणली तर गदारोळ केला.धनंजय मुंडे यांच्या पहिल्या पत्नी आपणच आहोत, हे सिद्ध करण्यासाठी करुणा मुंडेंची न्यायालयीन लढाई सुरु आहे. धनंजय मुंडे मात्र त्यांना पत्नी मानायला तयार नाहीत. आम्ही लिव्ह-इन-रिलेशनशीपमध्ये होतो, असा दावा ते करतात. तर करुणा मुंडे पत्नी असल्याचे पुरावे आहेत, असं सांगतात.वांद्रे कोटनि धनंजय मुंडे यांना दोषी ठरवत करुणा मुंडेंना दोन लाख रुपये पोटगी देण्याचे आदेश दिले होते. त्या निर्णयाविरोधात मुंडेंनी वरच्या कोर्टात धाव घेतली आहे. तर करुणा मुंडे ९ लाख रुपये पोटगीसाठी आग्रही आहेत. धनंजय मुंडेंना करुणा मुंडेंपासून झालेली दोन मुलं मान्य आहेत, परंतु पत्नी मान्य नाही, असा हा लढा आहे.

## गृहराज्यमंत्र्यांचा मोबाइल बीडमध्ये गायब, पोलिसांत तक्रार दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५बीड**

बीड जिल्ह्यात एक चकीत करणारी घटना घडली आहे. गृहराज्यमंत्र्यांचा योगेश कदम यांचा मोबाईल कॅमेऱ्यासमोरच गायब झाला. योगेश कदम बीड दौऱ्यावर आले आहेत. या दौऱ्यादरम्यान त्यांचा मोबाईल गायब झाला आहे. शुक्रवारी योगेश कदम यांनी मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची सांत्वनासाठी भेट घेतली. या



भेटीत माध्यमांचे कॅमेरे उपस्थित असताना त्यांचा मोबाईल अचानक गायब झाला.

योगेश कदम यांचा मोबाईल गायब झाल्याचं समजताच सर्वांनाच धक्का बसला. याप्रकरणी केज पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार नोंदवण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी याला दुजोरा दिला आहे. राज्याच्या गृहराज्यमंत्र्यांचा मोबाईलच सुरक्षित नसेल, तर सर्वसामान्य जनतेच्या सुरक्षेची हमी कशी मिळणार, असा सवा विरोधकांनी उपस्थित केला आहे.

दौऱ्यावेळी कॅमेऱ्यासमोरच मोबाईल गायब झाला, त्यामुळे बीड प्रशासन आणि पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मोबाईल हरवला की चोरीला गेला, याचा शोध पोलिसांनी सुरू केला आहे. ही घटना सोशल मीडियावरही चांगलीच चर्चेत आली आहे. या प्रकरणाचा लवकरच छडा लागावा, अशी मागणी शिवसेनेकडून करण्यात येत आहे. तर बीडमधील विरोधकांनी सरकारला सुरक्षेच्या मुद्द्यावरून धारेवर धरले आहे.

## राज ठाकरेंनी बँकांमध्ये मराठी बोलण्याचे आंदोलन 'अचानक' थांबवले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बँकांमध्ये मराठी बोलले जात नसल्याच्या मुद्द्यावरून सुरु केलेले आंदोलन थांबवण्याचे आदेश कार्यकर्त्यांना दिले आहेत. शनिवारी (५ एप्रिल) सोशल मीडियावर पत्र लिहित त्यांनी त्यांची भूमिका मांडली. यात आता आंदोलन थांबवा पण या मुद्द्यावरच लक्ष हटू देऊ नका, असे कार्यकर्त्यांना सांगितले आहे.



राज ठाकरे यांनी गुढीपाडव्याच्या मेळाव्यातून महाराष्ट्रातील राष्ट्रीयकृत बँका आणि खाजगी बँकांमध्ये मराठी बोलले जाते की नाही हे तपासण्याचे आणि बोलले जात नसेल तर बँक प्रशासनाला मराठी बोलण्याचा आग्रह धरण्याचे आवाहन मनसैनिकांना केले होते. या आदेशानंतर कार्यकर्त्यांनी आंदोलन सुरु केले.मात्र त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता होती. त्यामुळे हे आंदोलन थांबवण्याची मागणी बँक कर्मचारी संघटानांकडून सुरु होती. अखेर या मागणीची दखल घेत राज ठाकरे यांनी हे आंदोलन थांबवण्याचे आदेश दिले आहेत. याबाबत त्यांनी पत्र लिहूनच आता हे आंदोलन मराठी जनतेने हातात घ्यायला हवे असे सांगितले आहे.

## संपादकीय ......

# वक्फ सुधारणा : मुस्लिमांसाठी कल्याणकारी

*भारताच्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक परिप्रेक्ष्यातील वैविध्यपूर्ण सामाजिक रचनेत वक्फ ही सर्वात महत्त्वाची आणि तरीही क्षमतेपेक्षा कमी वापरात आणलेल्या संस्थांपैकी एक आहे. इस्लामी आध्यात्मिक परंपरेचा पाया असलेल्या या संस्थेत भारतातील मुस्लीम समुदायाच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीत बदल घडवून आणण्याची क्षमता आहे; मात्र प्रगल्भ वारसा आणि मोठ्या प्रमाणात जमिनीचा ताबा असूनही वक्फ व्यवस्थापनाला अकार्यक्षमता, गैरव्यवस्थापन आणि पारदर्शकतेचा अभाव या समस्यांनी ग्रासले आहे.*

*वक्फ ही भारतातील तिसरी सर्वात मोठी जमिनीची मालकी असलेली संस्था असूनही शिक्षण, आरोग्यसेवा आणि सामाजिक व आर्थिक उन्नतीच्या मुद्द्यांशी झगडत असलेल्या समाजाचे प्रतिनिधित्व करते, हा खरोखर विरोधाभास आहे. शतकांपूर्वी स्थापन झालेल्या वक्फचे मूळ उद्दिष्ट शाळा, रुग्णालये, ग्रंथालये आणि इतर सामाजिक संस्था, यासारख्या सार्वजनिक आस्थापनांची निर्मिती आणि देखभाल करून मुस्लीम समाजाचे कल्याण करणे, हे होते. एवढ्या मोठ्या साधनसंपत्तीचा वापर समाजाच्या कल्याणासाठी प्रभावीपणे होत नाही, ही बाब गेल्या अनेक दशकांपासून चिंतेचा विषय बनली आहे. वक्फला भेडसावणार्या या दीर्घकालीन समस्यांचे निराकरण करणे, हे या वक्फ विधेयक सुधारणांचे उद्दिष्ट आहे. या सुधारणा महत्त्वाच्या आहेत. कारण, मुतवल्ली (संरक्षक) या शून्य विश्वासार्हता असलेल्या काही सदस्यांकडून होत असलेला वक्फ मालमत्तेचा गैरवापर आणि वक्फ बोर्डांना या अमूल्य मालमत्तेचा सर्वोत्तम वापर करण्यापासून रोखणारी अकार्यक्षमता, यावर मुस्लीम समुदायामध्ये असलेली सहमती या सुधारणा मान्य करतात.*

*वक्फची सद्यस्थिती ही भारतातील मुस्लीम समाजासमोर व्यापक आव्हान आहे. वक्फ मालमत्तेच्या व्यवस्थापनामधील उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेच्या अभावामुळे अकार्यक्षमता आणि भ-ष्टाचाराला वाव मिळाला आहे. सध्याच्या वक्फ व्यवस्थेतील सर्वात ज्वलंत समस्या म्हणजे वक्फच्या मालकीच्या मालमत्तांची कालबाह्य भाडेरचना. यापैकी अनेक मालमत्ता दशकांपूर्वी अनेकदा १९५० च्या दशकात ठरवलेल्या दराने भाडेतत्त्वावर दिल्या जातात. आजच्या बाजारात हे भाडे अत्यल्प तर आहेच शिवाय थकीत रक्कमही अनेकदा नियमितपणे वसूल केली जात नाही. वक्फ मालमत्तेची बेकायदेशीर विक्री आणि अपव्ययाच्या आरोपांमुळे ही गोष्ट उघडकीला आली आहे, ज्यामुळे सामुदायिक कल्याणासाठी वापरता येण्याजोग्या संभाव्य महसुलात लक्षणीय घट झाली आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे, जयपूर शहराच्या मध्यवर्ती भागातील प्रसिद्ध शॉपिंग स्ट्रीट, ज्याला एमआय रोड म्हणून ओळखले जाते आणि जे संगानेरी गेट ते गव्हर्न्मेंट हॉस्टेलपर्यंत पसरले आहे. अनेकांना माहीत नसेल की, एमआय म्हणजे मिर्झा इस्माईल रोड. जयपूरमध्ये एमआय रोडवर असलेल्या काही मालमत्ता वक्फ बोर्डला सामुदायिक आणि धार्मिक कार्यासाठी दान करण्यात आल्या आहेत. बोर्ड या मालमत्ता भाड्याने देऊ शकते; पण कोणालाही विकू शकत नाही. एमआय रोडवरील १०० चौरस फूट ते ४०० चौरस फुटांच्या अशा अनेक व्यावसायिक मालमत्ता आहेत, ज्यांना सध्या दरमहा ३०० रुपये भाडे मिळते; पण भाडे धोरण अद्ययावत केल्यावर या जागांसाठी दरमहा सुमारे २५ हजार रुपये मिळतील. भारतात काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत प्रत्येक राज्यात अशा निष्काळजीपणाची हजारो उदाहरणे आहेत.*

*२००६ च्या सच्चर समितीच्या अहवालानुसार वक्फला त्याच्या मालमत्तेतून वार्षिक १२ हजार कोटी रुपयांचे उत्पन्न मिळू शकते; मात्र अल्पसंख्याक मंत्रालयाने केलेल्या सर्वेक्षणानुसार वक्फ मालमत्तेची प्रत्यक्ष संख्या ८.७२ लाखांहून अधिक असल्याचे समोर आले आहे. आज महागाई आणि सुधारित अंदाजांचा विचार केला, तर या मालमत्तांचे संभाव्य उत्पन्न वार्षिक २० हजार कोटी रुपयांपर्यंत असू शकते, तरीही प्रत्यक्ष उत्पन्न केवळ २०० कोटी रुपये आहे. व्यावसायिक आणि पारदर्शक व्यवस्थापनाने काय साध्य केले जाऊ शकते, त्याची ही झलक आहे. समाजकल्याणात महसूलनिर्मिती आणि गुंतवणुकीची प्रचंड क्षमता आहे. वक्फ मालमत्तांचे कार्यक्षमतेने व्यवस्थापन केले, तर त्या शाळा, विद्यापीठे, रुग्णालये अशा जागतिक दर्जाच्या संस्थांच्या उभारणीसाठी निधी पुरवतील. या संस्था केवळ भारतीय मुस्लीम समुदायाला नव्हे, तर संपूर्ण समाजाला सेवा देतील. भारतीय मुस्लीम म्हणून 'कल्याणा'विषयीची समज व्यापक हवी. कल्याण म्हणजे मोफत, आपले अस्तित्व टिकवण्यासाठी धडपडणार्या संस्था नव्हेत. त्याऐवजी आपण स्वावलंबी, समावेशक आणि अशा उच्च दर्जाच्या संस्था निर्माण करण्याची आकांक्षा बाळगायला हवी की, ज्या सर्वांची महत्त्वाकांक्षा वाढवतील. संयुक्त संसदीय समितीच्या शिफारशींनंतरचे अंतिम उम्मीद (यूएमईईडी) वक्फ सुधारणा विधेयक वक्फ विकासाबाबत न्याय्य अवकाश आणि व्याप्तीसाठी दूरदर्शी वचनबद्धता सिद्ध करणारे हवे, ज्यामुळे मुस्लीम समाजाचा सर्वांगीण विकास होईल. वक्फ बोर्ड आणि केंद्रीय वक्फ परिषदेच्या (सीडब्ल्यूसी) प्रशासनात फेरबदल करून समाजाची अधिक चांगली सेवा करू शकेल, अशी अधिक उत्तरदायी आणि पारदर्शक व्यवस्था निर्माण करण्याचा या विधेयकाचा प्रयत्न आहे; मात्र सुधारणा प्रशासनात अडथळा आणणार्या नसाव्यात. वक्फ बोर्डाच्या विश्वासार्ह प्रशासनाने महसूल निर्मितीच्या गंभीर प्रश्नाकडेही लक्ष द्यायला हवे.*

*वक्फची आर्थिक शाश्वतता जपण्यासाठी सध्याचे बाजारभाव प्रतिबिंबित होतील, अशी सुधारणा वक्फ मालमत्तांच्या भाड्याच्या रचनेत करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वक्फ आस्थापनाच्या मूळ आदेशानुसार या मालमत्तांमधून मिळणारा नफा मुस्लीम समाजकल्याण प्रकल्पांमध्ये पुन्हा गुंतवला जावा. सरते शेवटी भारतीय मुस्लीम म्हणून आपण हे मान्य करायला हवे की, वक्फ ही एक अत्यंत महत्त्वाची संस्था असून, ती अपयशी ठरू शकत नाही. केवळ सामाजिक-आर्थिक विकासच नव्हे, तर समावेशकता आणि सर्वोत्तमतेची भावना जोपासणार्या आपल्या समुदायाच्या क्षमतांचा पुरेपूर उपयोग करून घेणारी ही गुरुकिल्ली आहे. सुधारणा स्वीकारून आणि उत्तरदायित्वाचा आग्रह धरून आपण हे सुनिश्चित करू शकतो की, वक्फ मुस्लीम समाजाच्या कल्याणासाठी आणि संपूर्ण समाजाला योगदान देण्यासाठी पूर्ण क्षमतेने काम करेल. सुधारणेची हीच वेळ आहे आणि वक्फ मुस्लीम समाजाच्या आणि देशाच्या कल्याणासाठी एक प्रेरणास्रोत म्हणून क्षमता सिद्ध करेल, याची खात्री करणे, ही सामूहिक जबाबदारी आहे.*

# महापालिकेत पिंक महिला कक्षाचे आयुक्त कलंत्रेंच्या हस्ते उदघाटन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** महापालिकेत पिंक महिला कक्षाचे आयुराज्य शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी १०० दिवसाचा आराखडा निश्चित करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिका अंतर्गत रोखपाल विभाग येथे पिंक महिला कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

या कक्षाचे उदघाटन शुक्रवार ४ एप्रिल रोजी आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याकरीता या कक्षास महिलांच्या प्राप्त होणाऱ्या तक्रारी घेण्याकरीता वरिष्ठ लिपिक सविता पाटील यांची नेमणूक करण्यात आली.या कक्षेद्वारे महिलांकरीता माहिती, समस्याचे निराकरण, मदत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.महिलांना सुचना व सल्ला दिला जाईल तसेच येथे तक्रारी नोंदविल्या जातील.यावेळी महानगरपालिकेतील महिला कर्मचारी व बाहेरील काही कामानिमित्य येणाऱ्या महिलांच्या ज्या समस्या आहेत, त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महिलांनी मनपातील पिंक महिला कक्षांशी संपर्क साधावा, असे आवाहन मनपा प्रशासनाद्वारे करण्यात आले आहे.या उदघाटन प्रसंगी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, सहाय्यक आयुक्त दीपिका गायकवाड, कार्यालय अधिक्षक नंदकिशोर पवार, जितेंद्र भिसडे रोखपाल, वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रतिभा आत्राम, ज्योती पारडशिंगे, अश्विनी लोंदे, कल्पना मावदे, पद्मा पवार, रंगा धुर्वे, राजकुमारी चव्हाण, शुभांगी कनेर, श्रद्धा बिसने, संगीता बोरवार उपस्थित होते.

# एप्रिलमध्ये 'या' भाज्यांची लागवड करा अन् कमी दिवसांत चांगला नफा मिळवा!

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक**

एप्रिल महिना सुरू झाला आहे. अशा परिस्थितीत, रब्बी पिकांच्या कापणीसोबतच, शेतकरी उन्हाळी पिकांच्या नियोजनात व्यस्त आहेत. या हंगामात भाज्यांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते, कारण त्यांची मागणी देखील जास्त असते.

अनेकदा उन्हाळ्यात सिंचनाच्या सुविधा नसल्यामुळे बहुतेक शेतकरी शेती करत नाहीत. त्यामुळे ज्यांच्याकडे पाण्याची उपलब्धता आहे, असे शेतकरी भाजीपाला लागवड करतात. जर या हंगामात भाजीपाला लागवड करायची असल्यास, या तीन नफा मिळवून देणाऱ्या भाज्यांची लागवड नक्की करता येईल.

**मुळा लागवड** – उन्हाळ्यात लोकांना सॅलड खूप खायला आवडते. सॅलड म्हणून मुळ्याला मोठी मागणी आहे. उन्हाळ्यात चांगले उत्पादन देणाऱ्या मुळ्याच्या काही जाती तुम्हाला बाजारात मिळतील. यामध्ये चेटकी मुळा आणि बैसाखी मुळा या जातींचा समावेश आहे, ज्या उन्हाळ्यातही चांगले उत्पादन देतात. खरं तर, मुळा हे कमी कालावधीचे पीक आहे. त्याच्या सुधारित जाती पेरल्यानंतर, ते ३०–४० दिवसांत तयार होते. उन्हाळ्यात मुळ्याला जास्त मागणी असते, त्यामुळे बाजारात त्याला चांगला भाव मिळतो. यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळते.

**माठ किंवा तांदुळजा लागवड करा** – या वनस्पतीला माठ किंवा तांदुळजा किंवा तांदुळका असेही म्हणतात. तांदुळकाच्या पानांपासून भाजीही फार छान बनते. वर्षातून दोनदा याची लागवड केली जाते. त्याची लागवड पावसाळ्यात किंवा उन्हाळ्याच्या हंगामात करावी. त्याची पाने आहारात वापरली जातात, कारण त्याच्या पानांमध्ये अनेक प्रकारचे पोषक घटक असतात. हे खाल्ल्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. म्हणून, शेतांव्यतिरिक्त, ते स्वयंपाकघरातील बागेत आणि टेरेस बागेत देखील वाढवता येते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष



**काकडीची लागवड करा.**

उन्हाळ्याच्या हंगामात काकडीला सर्वाधिक मागणी असते. मुळ्याप्रमाणेच काकडीचे सॅलड खूप खाल्ले जाते. एप्रिल महिन्यात त्याची लागवड केल्यास चांगले उत्पादन मिळते. चांगले उत्पादन मिळविण्यासाठी, त्याच्या सुधारित जातींची लागवड करावी. उन्हाळ्यात जास्त मागणी असल्याने त्याची किंमतही चांगली राहते आणि शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळते.

**या गोष्टी लक्षात ठेवा.**

एप्रिल महिन्यात शेतकऱ्यांनी भाजीपाला लागवड करताना काही खास गोष्टी लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ, भाज्यांची लागवड ओळीत आणि अंतर राखून करावी. त्याचबरोबर झाडांच्या वाढीसाठी योग्य प्रमाणात खते आणि आवश्यक पोषक तत्वांची फवारणी करावी. यासोबतच, एप्रिलमध्ये पिकवलेल्या भाज्यांमध्ये सिंचनाची काळजी घेणे अत्यंत महत्वाचे आहे. सिंचनामुळे शेतात अनावश्यकपणे वाढणारे तण साफ करत राहणे खूप महत्वाचे आहे. या सर्व मूलभूत गोष्टी लक्षात ठेवून, जर तुम्ही एप्रिल महिन्यात भाज्या लावल्या तर नक्कीच चांगले उत्पादन मिळेल आणि तुम्ही चांगला नफा मिळवू शकता.

# यवतमाळ पोलिसांची ड्रग्ज माफियावर नागपुरात कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ यवतमाळ** : ड्रग्ज माफियाचे विदर्भातील नेटवर्क चालविणारा यवतमाळ पोलिसांच्या कचाट्यात सापडला आहे. २८ मार्च रोजी एलसीबी पथकाने कळंब येथे एका ड्रग्ज कॅरिअरला ताब्यात घेतले. अंग झडतीत त्याच्याकडून २६ ग्रॅम एमडी ड्रग्ज प्राप्त झाले. या ड्रग्जचा पुरवठा करणारा कोण, त्याचे नाव पुढे येताच एलसीबी पथकाने नागपुरातील निर्मलनगरी टाऊनशिप (नंदनवन पोलिस ठाणे) येथून एकाला अटक केली. त्याच्या जवळून एमडी ड्रग्ज व चरस, रोख रक्कम असा मुद्देमाल रविवार ३० मार्च रोजी जप्त केला.इस्तीयाक हुसेन मोहसीन हुसेन ऊर्फ इस्तीयाक खादीम (सेवक) (४५) रा. ताजबाग ह.मु. निर्मलनगरी टाऊनशिप नंदनवन नागपूर असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. इस्तीयाक हुसेन हा ताजबाग येथे खादीम म्हणजेच सेवक म्हणून राहत होता. या सोबतच त्याने निर्मलनगरी टाऊनशिप येथील उच्चभ्रू वस्तीत फ्लॅट घेऊन तेथून एमडी ड्रग्ज, चरस या अमली पदार्थाचे विदर्भातील नेटवर्क उभे केले होते. त्याचा एक कॅरिअर अभय राजेंद्र गुप्ता (३०) रा. बुटीबोरी हा कळंब येथे ड्रग्ज विक्रीसाठी आला असताना २८ मार्च रोजी यवतमाळ एलसीबी पथकाच्या हाती लागला. अभयच्या कबुलीवरूनच कळंब पोलिस ठाण्यात अभय गुप्ता व इस्तीयाक हुसेन या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. ड्रग्ज कॅरिअर अभय गुप्ता याच्याकडून मिळालेली माहिती खरी आहे की नाही, याची पडताळणी करून यवतमाळ एलसीबीतील सहायक निरीक्षक संतोष मनवर व त्याच्या पथकातील कर्मचाऱ्यांनी नागपूर गाठले. ताजबाग परिसरात चौकशी केल्यानंतर इस्तीयाक हुसेन हा येथे सेवेकरी असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर इस्तीयाक हुसेन याचा निर्मलनगरी टाऊनशिपमध्ये फ्लॅट असल्याचेही पुढे आले.




## उन्हाळ्यात कधी आणि किती वेळ चालणं योग्य ठरतं?

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक २**

उन्हाळ्यात आरोग्याची अधिक काळजी घ्यावी लागते. कारण तापमान वाढलं की, थकवा आणि शरीरात पाणीही कमी होण्याचा धोका वाढतो. अशात सकाळी फिरायला जाणं खूप फायदेशीर ठरू शकतं. सकाळी पायी चालल्यानं फ्रेशही वाटतं. मात्र, अनेकांना असा प्रश्न पडतो की, उन्हाळ्यात कधी पायी चालावं आणि किती वेळ चालावं? याच प्रश्नाचं उत्तर आज आम्ही सांगणार आहोत.

**उन्हाळ्यात पायी चालण्याची योग्य वेळ**–उन्हाळ्यात पायी चालण्यासाठी सकाळची वेळ सगळ्यात बेस्ट मानली जाते. कारण यावेळी वातावरण जरा थंड असतं आणि फ्रेश असतं. दिवसांमध्ये सामान्यपणे सकाळी ५ ते ७ वाजता दरम्यान चालण्याचा सल्ला दिला जातो. यावेळी हलका सूर्यप्रकाश असतो, ज्याद्वारे व्हिटॅमिन डी सुद्धा मिळतं. तसेच सकाळी उन्ह कमी राहतं त्यामुळे उन्ह सुद्धा लागत नाही.

**किती वेळ चालावं?**– उन्हाळ्यात सामान्यपणे रोज २० ते ३० मिनिटं चालावं असं मानलं जातं. हळूहळू चालण्याची वेळ वाढवू शकता. ही वेळ वाढवून ३० ते ६० मिनिटं करावी. आणखी एक महत्वाचा मुद्दा म्हणजे जेवढं शक्य आहे किंवा सहन होतं तेवढंच चालावं.

**उन्हाळ्यात पायी चालण्याचे फायदे१) थंडावा आणि फ्रेश**

सकाळी वातावरण दुपारपेक्षा थंड असतं. त्यामुळे पायी चालण्यासाठी सकाळची वेळ बेस्ट मानली जाते. पायी चालल्यानं शरीराला ऊर्जा मिळते आणि दिवसभर फ्रेशही वाटतं.

**२) वजन कमी होतं** रोज




सकाळी पायी चालल्यानं मेटाबॉलिज्म बूस्ट होतं आणि शरीरातील एक्स्ट्रा कॅलरी बर्न होतात. यानं वजन कमी करण्याचा प्रोसेस वेगानं होते.

**३) हृदय निरोगी राहतं**नियमितपणे पायी चालल्यानं ब्लड प्रेशर संतुलित राहतं आणि हृदयरोगांचा धोकाही कमी होतो. सकाळची फ्रेश हवा हृदयासाठी फायदेशीर ठरते. तसेच मनाला शांतता सुद्धा मिळते.

**४) मानसिक शांतता, तणाव कमी होतो**– रोज सकाळी थोडा वेळ पायी चालल्यानं तणाव कमी होतो आणि मनाला शांतात मिळते. पायी चालताना निसर्गासोबत वेळ घालवल्यानं मनाला आराम मिळतो.

**५) पचन तंत्र मजबूत होतं**सकाळी पायी चालल्यानं पचन तंत्र सक्रिय होतं आणि बद्धकोष्ठतेची समस्याही दूर होते. पायी चालणं तुमच्या पोटासाठी खूप फायदेशीर ठरतं.

# हाय सिक्युरिटी नंबर प्लेटचे दर वाहन मालकांची आर्थिक पिळवणूक करणारे

## हायकोर्टात आव्हान : राज्य सरकारला मागितले स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** राज्यामधील हाय सिक्युरिटी रेजिस्ट्रेशन प्लेटच्या (एचएसआरपी) दराला मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठात आव्हान देण्यात आले आहे. हे दर वाहन मालकांची आर्थिक पिळवणूक करणारे आहेत, असा आरोप करण्यात आला आहे. न्यायालयाने शुक्रवारी राज्य सरकारला नोटीस जारी करून यावर तीन आठवड्यात स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश दिले.

प्रकरणावर न्यायमूर्तीद्वय नितीन सांबरे व वृषाली जोशी यांच्यासमक्ष सुनावणी झाली. एचएसआरपी दराविरुद्ध डिजिटल मीडिया पत्रकार सूदर्शन बागडे यांनी जनहित याचिका दाखल केली आहे.

रस्ते सुरक्षा सुनिश्चित करणे, वाहनांशी संबंधित गुन्हे थांबविणे आणि वाहतूक नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणे या उद्देशाने १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना एचएसआरपी लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. परंतु, 'एचएसआरपी'चे दर निश्चित करताना तारतम्य ठेवण्यात आले नाही. देशामध्ये 'एचएसआरपी'चे सर्वाधिक दर महाराष्ट्रात आहेत. शेजारी असलेल्या गोवामध्ये दुचाकीच्या 'एचएसआरपी'साठी




१५५ व कारच्या 'एचएसआरपी'साठी २०३ रुपये घेतले जात आहेत. महाराष्ट्रात मात्र अनुक्रमे ४५० व ७४५ रुपये दर आकारला जात आहे. तसेच, त्यावर १८ टक्के जीएसटी घेतला जात आहे. आंध्र प्रदेश, राजस्थान, गुजरात व पंजाबमध्येही महाराष्ट्रापेक्षा कमी दर आहेत. निर्धारित मुदतीत एचएसआरपी लावली नाही तर, १० हजार रुपये दंड ठोठावला जाणार आहे आणि एचएसआरपी लावणाऱ्यांकडून जुन्या दंडाची वसुलीही केली जाणार आहे. त्यामुळे या प्रकरणात न्यायालयाने तातडीने हस्तक्षेप करून राज्यात परवडणारे दर निश्चित होतपर्यंत 'एचएसआरपी'ला स्थगिती द्यावी आणि जुन्या दंडाची वसुली रद्द करावी, असे याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ५ एप्रिल २०२५ — शहर/ग्रामिण


# पान मटेरियल विक्रीच्या दुकानात गोळीबार





**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती :**

स्थानिक वसंत चौक परिसरातील एका पान मटेरियल विक्रीच्या दुकानात देशी कट्ट्यातून गोळीबार करण्यात आला. दुकानातील साहित्याची तोडफोड करण्यात आली. ही खळबळजनक घटना शुक्रवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास घडली. या घटनेने शहरातील अत्यंत गजबजलेल्या बाजारपेठेत एकच खळबळ उडाली. या प्रकरणी अज्ञात तीन हल्लेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचा शोध सुरू आहे.

वसंत टॉकीज परिसरात विक्की मंगलानी यांचे जय भोले केंद्र नामक पानमटेरियल विक्रीचे दुकान आहे. शुक्रवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास त्यांचे भाऊ सागर मंगलानी व एक कर्मचारी दुकानात होते. त्यावेळी तीन हल्लेखोर अचानक दुकानात शिरले. विक्की कुठे आहे, अशी विचारणा त्यांनी सागर यांना केली. सागर हे त्यांच्याशीब् बोलत असतानाच हल्लेखोरांपैकी एकाने जवळील देशी कट्ट्याने दुकानात एक राउंड फायर केला. त्यानंतर हल्लेखोरांनी दुकानातील साहित्याची तोडफोड करून तेथून पळ काढला.या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. तातडीने घटनेची माहिती कोतवाली पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळताच कोतवालीचे ठाणेदार मनोहर कोटनाके यांनी आपल्या ताफ्यासह घटनास्थळ गाठून पंचनामा केला. याबाबत माहिती मिळताच पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, साहाय्यक आयुक्त शिवाजी बचाटे,



गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार, विशेष पथकाचे पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले यांनीही घटनास्थळ गाठून पाहणी केली. या प्रकरणी सागर मंगलानी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात तीन हल्लेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्यांचा कसून शोध सुरू आहे.

# ऋणमोचन येथील विकासकामासाठी शासनाकडून १४.४० कोटींचा निधी

## आमदार रवी राणा यांची मागणी मुख्यमंत्र्यांकडून मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५ अमरावती -**


अमरावती जिल्ह्यातील संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी ऋणमोचन येथील विकास कामांसाठी निधी देण्यात यावा, अशी आमदार रवी राणा यांची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केली. राज्य सरकारने ऋणमोचन येथील विकास कामांसाठी १४ कोटी ४० लाखांचा निधी मंजूर केला आहे. आ. रवी राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्र लिहून पाठपुरावा केला होता तसेच अनेकवेळा लक्षवेधी सूचना मांडून सरकारचे लक्ष वेधले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने श्री संत गाडगे बाबा यांची कर्मभुमी ऋणमोचन येथील विकासकामांसाठी १४ कोटी ४० लक्ष मंजूर करण्यात आले. त्यासंबंधीचा ग्राम विकास विभाग शासन निर्णय प्र. क्रमांक. २४/११/दि.२८मार्च २०२५ रोजी निर्गमित झाला. गाडगे बाबा यांच्या जीवनचरित्रावर आधारित संग्रहालय, घाट बांधकाम, सभागृह बांधकाम, अंतर्गत रस्ते. सौंदर्याकरण, वृक्ष लागवड, वाहनतळ बांधकाम इत्यादी कामे मंजूर निधीतून केली जाणार आहे.-



# आधारभूत किमतीवर चना नोंदणीस सुरुवात

## ठरवून दिलेल्या निकषानुसार फक्त एफएक्यु दर्जाचा माल होणार खरेदी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती-** आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत चना पिकाच्या ऑनलाईन नोंदणीस शुक्रवारपासून (ता. चार) सुरुवात झालेली आहे. चना शेतकऱ्यांनी उत्पादक आपली ऑनलाईन नोंदणी घ्यावी, करुन असे आवाहन करण्यात आले आहे. ऑनलाईन नोंदणीकरीता मुळ अद्ययावत सातबारा चना पिकपेरा असलेला, आधारकार्ड झेरॉक्स, बँक पासबुकची स्पष्ट झेरॉक्स किंवा रद्द केलेला धनादेश, नोंदणी अर्ज इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणीकरीता अर्ज स्विकारणे संस्थेचे कार्यालय शेतकरी सदन, चित्रा चौक, अमरावती येथे सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरु आहे. शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार फक्त एफएक्यु दर्जाचा माल खरेदी करण्यात येईल. चना पिकाकरीता शासनाचा हमीभाव प्रतीकिंटल ५६५० रुपये आहे. शेतकऱ्यांनी या योजनेअंतर्गत आपली नोंदणी करून शासनाचे हमीभावाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमरावती सहकारी शेतकी खरेदी विक्री समितीचे उपाध्यक्ष मुकुंद रा. देशमुख व संस्थेच्या संचालकांनी केले आहे. ज्या शेतकऱ्यांनी स्वतः बाहेरुन किंवा सेतुवरुन चना पिकाची ऑनलाईन नोंदणी केलेली आहे. त्यांनी आपली कागदपत्रे



मान्यतेकरीता संस्थेचे कार्यालय शेतकरी सदन, चित्रा चौक, अमरावती येथे सादर करावी. त्याशिवाय अर्ज मान्य होणार नाहीत व शेतकऱ्याचे नाव ऑनलाईन यादीत येणार नाही.-

# ४० किलो गांजासह पाच जण अटकेत

## तीन तरुणींचा समावेश, गुन्हे शाखेच्या युनिट दोनची नांदगाव पेठ हद्दीत कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती-**

कारमधून गांजा तस्करी करणाऱ्या पाच जणांना गुन्हे शाखेच्या युनिर ने अटक केली. या कारवाईत ४०.३५ किलो गांजा, कार, मोबाइल व रोख असा एकूण १३ लाख ५२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये तीन तरुणींचा समावेश आहे. ही कारवाई शुक्रवारी दुपारी नांदगाव पेठ ठाण्याच्या हद्दीतील वाळकी मार्गावर करण्यात आली.सै. रशीद सै. जमशिद (३५), अरफाक दानिश शब्बीर पटेल (२३, दोघेही रा. जुनी वस्ती, बडनेरा) या दोघांसह १९ ते २२ वयोगटातील तीन तरुणींना अटक करण्यात आली. नांदगाव पेठ टोल नाक्याकडून वाळकी गावाकडे जाणाऱ्या मार्गाने काळ्या रंगाच्या कारमधून दोन पुरुष व तीन महिला गांजाची तस्करी करत असल्याची माहितीगस्तीवर असलेल्या गुन्हे शाखेच्या युनिट दोनला मिळाली. या माहितीच्या आधारावर वाळकी मार्गावर नाकाबंदी करून ही कार थांबवण्यात आली. त्यावेळी कारमध्ये सै. राशिद, अरफाक दानिश, तीन तरुणी असे पाच जण बसून होते. कारची झडती घेतल्यावर त्यात ४०.३५ किलो गांजा आढळून आला. त्यानुसार गुन्हे शाखेच्या युनिट दोनने पाचही आरोपींना अटक करून त्यांच्याकडून ८ लाख ६ हजार ६०० रुपये किमतीचा गांजा, दोन मोबाइल, ५ लाख रुपये किमतीची कार व २३ हजार ५०० रुपये रोख असा एकूण १३ लाख ५२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीविरुद्ध नांदगाव पेठ ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई गुन्हे शाखेच्या युनिट दोनचे पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक महेशकुमार इंगोले यांच्या सह पथकाने केली.



# अतिरिक्त, विशेष रेल्वेची सोय केल्यानंतरही एप्रिल, मे महिन्याचे आरक्षण झाले फुल्ल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती-**

अमरावती उन्हाळ्यात शाळा, महाविद्यालयांना सुट्या असल्यामुळे एप्रिल, मे, जून महिन्यात मोठ्या प्रमाणात नागरिक पर्यटन, नातेवाइकांकडे जाण्याचा बेत आखतात. त्यातही मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर या महानगरांकडे जाण्याचा बहुतेक प्रवाशांचा ओढा असतो. रेल्वेत होणारी गर्दी बघता मध्य रेल्वेने विशेष, अतिरिक्त ट्रेनची घोषणा केली असून साप्ताहिक ट्रेनच्या फेऱ्यांची संख्याही वाढवली असली तरी नियमित रेल्वे गाड्यांसह विशेष व अतिरिक्त गाड्यांचेही आरक्षण फुल्ल आहे. बहुतेक नागरिक हे ऑनलाइन बुकिंग करतात. त्यामुळे तिकीट खिडकीवर जाऊन बुकिंग करणाऱ्यांना अभावानेच आरक्षण मिळते. एवढेच नव्हे तर प्रत्येक गाड्यांमध्ये प्रतीक्षा यादी ६० च्या वर आहे.अशात अनेक प्रवासी तत्काळ आरक्षणाच्या भरवशावर असतात. मात्र, हे बेभरवशाचे काम आहे. हमखास आरक्षित आसन किंवा बर्थ मिळेल याची कोणतीही हमी नसते. ते बघता अनेक जण आधीच आरक्षण करून ठेवतात. परंतु, ज्यांचा ऐनवेळी बेत ठरला किंवा ज्यांना ऐनवेळी आमंत्रण आले अशांना मात्र आरक्षण मिळवण्यासाठी सध्या चांगलीच धावपळ करावी लागत आहे. खासगी ट्रॅव्हल्सच्या तुलनेत रेल्वेचे तिकीट स्वस्त असल्याने एसी तृतीय श्रेणीचे आरक्षित तिकीट घेण्यास प्रवासी मागेपुढे बघत नाहीत. परंतु, तेही सध्या मिळेनासे झाले आहे. त्यामुळे अनेकांना आपला प्रवासाचा बेत एकतर रद्द करावा लागत आहे किंवा पुढे ढकलावा लागत आहे. जेव्हा आरक्षण मिळेल, तेव्हाच जाऊ असे प्रवाशांनी सांगितले. कारण, जोवर आरक्षण होत नाही तोवर रेल्वेत चढताच येत नाही. सामान्य श्रेणीत लांब पल्ल्याचा प्रवास हा फारच त्रासदायक असतो. त्यामुळे कोणी हिंमतही करत नाही, अशी सध्याची स्थिती आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सोमवार, १४ एप्रिलला रोजी आहे. तसेच १२ एप्रिलला महिन्यातील दुसरा शनिवार असून, या दिवशी हनुमान जन्मोत्सव आहे. तसेच त्यानंतर १३ ला रविवार आहे. तीन दिवस सलग सुट्या आल्यामुळे एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात तसेच १४ एप्रिलनंतर तीन दिवस प्रतीक्षा यादी लांबलचक आहे. अनेकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीसाठी गृहनगरात यायचे असल्याने आरक्षण मिळेनासे झाले आहे. मुंबई, पुण्याहून गृहनगराकडे गेलो तर काही दिवस राहून मगच परतावे, असा विचार अनेकजण करतात. त्यामुळे या कालावधीत आरक्षण मिळणे कठीण झाले आहे.




# शहरातील अनेक भागात अंधाराचे साम्राज्य

## अचलपूरातील अनेक भागांतील रस्त्यावरील दिवे बंद, नागरिक त्रस्त प्रशासकांचे दूर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अचलपूर: -**

अचलपूर नगरपरिषदेत प्रशासक राज अस्तित्वात असतानाही वरिष्ठ अधिकारी कुंभकर्णाच्या निद्रेत आहेत. कंत्राटदाराच्या बेकायदेशीर कमाईवर नगरपरिषद अधिकाऱ्यांचे वरदहस्त असल्याचे आरोप नागरिक करत आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांचा कंत्राटदाराला सहकार्य असल्यामुळे समस्या सोडवण्याबाबत कोणतीही कारवाई होत नाही.अचलपूर नगर परिषद क्षेत्रातील अनेक भागांमध्ये रस्त्यावरील दिवे अनेक दिवसांपासून बंद आहेत. फरमान पुरा,सुलतानपुरा हिरापुरा गेट ईदगा चांदूर नाका आणि जीवनपुरा अचलपूर नाका, समरसपुरा यांसारख्या भागांमध्ये रात्रीच्या वेळी अंधार दाटलेला असतो. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे की, रस्त्यावरील दिवे बंद असल्यामुळे रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य असते. यामुळे अपघात, चोरी आणि इतर



गुन्हेगारी घटनांची शक्यता वाढली आहे. नागरिकांनी नगरपरिषदेकडे अनेकवेळा तक्रार केली, परंतु अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही.नागरिकांचे म्हणणे आहे की, नगरपरिषदेतील अधिकारी समस्या सोडवण्यासाठी कोणतीही पावले उचलत नाहीत. वारंवार तक्रार करूनही दिव्यांची दुरुस्ती किंवा बदल केले गेले नाहीत. नागरिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, लवकरात लवकर रस्त्यावरील दिव्यांची दुरुस्ती करण्यात यावी, जेणेकरून सुरक्षिततेची भावना निर्माण होईल.अंधारामुळे अपघात, चोरी आणि इतर गुन्हेगारी घटनांचा धोका वाढला आहे. शाळा-कॉलेजचे विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिक रात्री बाहेर पडण्यास घाबरतात.

### नागरिकांची मागणी

नागरिकांनी नगरपरिषदेकडे लवकरात लवकर रस्त्यावरील दिव्यांची दुरुस्ती करण्याची आणि त्यांची नियमित देखभाल करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने जबाबदारी स्वीकारून नागरिकांच्या समस्यांचे समाधान करावे, अशी अपेक्षा जनते कडून व्यक्त हो आहे.-

# मनपा क्षेत्रातील १७०० जन्म-मृत्यू प्रमाणपत्र रद्द

## तहसीलदारांऐवजी नायब तहसीलदारांनी आदेशित केल्याचे प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती-**

महापालिका प्रशासनाने शुक्रवारी जन्माचे १६५४ तर मृत्यूचे ७० दाखले रद्द करण्याचे आदेश निर्गमित केले आहे. ज्यांना संबंधित दाखले वितरित करण्यात आलेले आहेत, त्यांना यासंदर्भात हा आदेश पाठविला जाणार असून त्यांनी या जन्ममृत्यू प्रमाणपत्राचा कुठेही उपयोग करु नये, अशा सूचना दिल्या जाणार आहेत. ज्यांना हे दाखले देण्यात आलेत ते आदेश तहसीलदारांनी देणे अभिप्रेत होते, मात्र ते आदेश नायब तहसीलदारांनी दिल्याने संबंधित दाखले रद्द करण्यात आले.

रावती, अंजनगांव सुर्जी तालुक्यात सर्वाधिक जन्म-मृत्यू प्रमाणपत्र दिल्याचे नमूद केले होते. माजी खासदार सोमय्या यांच्या आदेशावरुन जिल्हाधिकाऱ्यांनी समिती नियुक्त करुन पडताळणी केली. उल्लेखनीय असे दाखले रद्द करण्यात आले.

माजी खासदार किरीट सोमय्या यांनी अमरावती जिल्ह्यात बांगलादेशींना जन्म प्रमाणपत्र दिल्याचा आरोप केला.त्यामध्ये अमरावती,अंजनगांव सुर्जी तालुक्यात सर्वाधिक जन्म-मृत्यू प्रमाणपत्र दिल्याचे नमूद केले होते. माजी खासदार सोमय्या यांच्या आदेशावरुन जिल्हाधिकाऱ्यांनी समिती नियुक्त करुन पडताळणी केली. उल्लेखनीय असे की, सन २०२३ मध्ये शासनाने जन्म ाच्या नोंदी नसतील तर लाभार्थ्यांचापैसा व वेळ वाचविण्यासाठी प्रमाणपत्र देण्यासंदर्भातील आदेश तहसीलदारांनी द्यावे, असे परिपत्रक काढले. हे आदेश पूर्वी न्यायालयातून प्राप्त करावे लागत होते. न्यायालयीन प्रकियेला अधिक वेळ व पैसा खर्च होत असल्याने ते अधिकार तहसीलदारांना देण्यात आले. तहसीलदारांनी मात्र अधिक कामे असल्याचे कारण सांगत देत ते अधिकार नायब तहसीलदारांना दिले. त्यामुळे काही तालुक्यात सर्वाधिक दाखले देण्यासंदर्भात नोंदी झाल्याने कागदपत्रांची छाननी करण्यात आली किंवा नाही, काही ठिकाणी फक्त आधारकार्डावरच दाखले देण्यात आल्याचे निर्दशनास आल्याने २१ मार्च रोजी अमरावती तहसील कार्यालयाकडून महापालिकेला पत्र प्राप्त झाले. या पत्रात तहसीलदारां ११ ऑगस्ट २०२३ ते २१ जानेव २०२५ पर्यंत दिलेले जन्म-मृत प्रमाणपत्र रद्द करण्याचे आदेश दि तहसीलदारांचे पत्र प्राप्त झाल्या महापालिकेने ऑगस्ट ते जाने महिन्यातील नायब तहसील आदेशित केलेले जन्माचे १६५४ तर मृत्यूचे ७० दाखले रद्द करण्याचा निर्णय घेतला.



ज्यांना संबंधित प्रमाणपत्र वितरित करण्यात आलेत. त्यांना पत्र पाठविण्यात येणार आहे. त्यांना हे प्रमाणपत्र कुठेही वापरता येणार नाही, अन्यथा त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

**- प्रतिभा आत्राम**, अधिक्षक जन्म-मृत्यू विभाग, मनपा अमरावती.

तहसीलदारांनी पाठविलेल्या पत्रानुसार महापालिका क्षेत्रातील जन्ममृत्यू प्रमाणपत्र रद्द कारवाई करण्यात आली. संबंधित प्रमाणपत्र धारक त्या प्रमाणपत्राचा कुठे ही वापर करणार नाहीत.**-डॉ. विशाल काळे**, वैद्यकीय आरोग्य अधिकारी-

# राजापेठ चौकात श्री राम नवमी उत्सव भव्य आणि दिव्य पद्धतीने होणार साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** रामनवमीनिमित्त अमरावती शहरात श्री राम जन्मोत्सवाची तयारी जोरात सुरू आहे. त्याच अनुषंगाने, दरवर्षीप्रमाणे, या वर्षीही, रविवार, ६ एप्रिल रोजी, स्वर्गीय ब्रिजनाथ मिश्रा बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्या संयुक्त विद्यमाने युवा स्वाभिमान पार्टी आणि सूरज मिश्रा मित्र मंडळातर्फे राजापेठ चौकात भव्य श्री राम नवमी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते . या उत्सवाला भव्य आणि दिव्य स्वरूप देण्यासाठी, सूरज मिश्रा यांच्या मित्र मंडळाने जोरदार तयारी सुरू केली आहे . ६ एप्रिल रोजी राजापेठ चौकात श्री राम नवमी महोत्सवाचे आयोजन करणारे सूरज मिश्रा यांनी राम नवमी महोत्सवाचे सविस्तर स्वरूप स्पष्ट करताना सांगितले की, हा उत्सव केवळ हिंदूंसाठी नाही तर अमरावतीतील सर्व समुदायांच्या लोकांसाठी आहे. श्री राम हे केवळ हिंदूंचेच नाही तर अविभाजित भारताचे पूर्वज आहेत आणि आपण सर्व त्यांचे वंशज आहोत आणि या उत्सवाच्या माध्यमातून श्री रामाचा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचला पाहिजे, म्हणून अमरावतीतील सर्व समाजातील सदस्यांना या भव्य दिव्य उत्सवात सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.



सायंकाळी ५:०० वाजता भगवान श्री रामचंद्रजींची महाआरती आणि पूजा आणि खिचडी आणि शरबत वाटपाने उत्सवाची सुरुवात होईल. स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित छावा या सुपरहिट चित्रपटाची प्रेरणा घेऊन भव्य नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात एका भव्य डीजेचे आयोजन केले जाईल. लाईट्स आणि लाईव्ह ऑर्केस्ट्रा देखील समाविष्ट आहेत.

रामनवमीच्या या शुभमुहूर्तावर योगयोग मा. नवनीत रवी राणा यांच्या वाढदिवसानिमित्त खासदार श्रीमती अभिष्टचिंतन समारंभाचेही आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांच्या राजापेठ चौकातून सुरू होणाऱ्या शहरातील सर्वात भव्य मिरवणुकीचे जोरदार आतषबाजीने स्वागत केले जाईल.

# व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी
# पैसे न दिल्याने पिता-पुत्राला बेल्ट, काठीने मारहाण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती:**गांजा पितानाचा व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन पैशांची मागणी केली. मात्र पैसे न दिल्यामुळे बेल्ट व काठीने मारहाणही केली. ही घटना गाडगेनगर पोलिसांच्या हद्दीत पॅराडाईज कॉलनीजवळ घडली. पोलिसांनी ब्लॅकमेल करुन मारहाण करणाऱ्या तिघांविरुध्दगुन्हा दाखल केला अहे. गुरुवारी दुपारी ३-४५ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. मोहम्मद सईद पटेल यांनी याविषयी गाडगेनगर पोलिसांकडे तक्रार दिली. त्यानुसार आपला मुलगा आणि अन्य दोघांसह ते पॅराडाईज कॉलनीजवळील बागेत गेले होते. त्यातील दोघे सिगरेटओढत होते. हा व्हिडीओ

## तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

कैफअली खान मुजाहीद खान (१९) याने काढला, आणि त्यांना म्हणाला, तुम्ही गांजा पित असल्याचा व्हिडीओ काढला आहे. तो डिलीट करायचा असेल तर पैसे द्या, नाहीतर सोशल मिडियावर टाकतो. त्यांनी पैसे देण्यास नकार दिल्यामुळे, त्याने दोघांनाही बेल्ट व काठीने मारहाण केली. पोलिसांनी याप्रकणी कैफ अलीखान मुजाहीद खान यासह सोहेल व मुन्ना या साथीदारांविरुध्द कलम ११८-१/३-५ बीएनएस नुसार गुन्हा दाखल केला आहे.-

# आता बायोमेट्रिक किंवा फेस रिडिंग हजेरीनुसारच वेतन, अन्यथा..

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अकोला –** आरोग्य विभागात बायोमेट्रिक हजेरीची सक्ती करण्यात आली आहे. आरोग्य सेवा आयुक्तांनी वारंवार सूचना दिल्यावरही त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. त्यामुळे आता कठोर पावले उचलण्यात आले असून १ एप्रिलपासून बायोमेट्रिक किंवा फेस रिडिंग हजेरीनुसारच वेतन अदा केले जाणार असल्याचे आरोग्य उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी यांनी स्पष्ट केले. जि. प. आरोग्य कर्मचाऱ्यांनी बायोमेट्रिक हजेरीला तीव्र विरोध केला. महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटनांनी यातून वगळण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांच्याकडे निवेदन सादर केले.



सर्व आरोग्य संस्थामध्ये बायोमेट्रिक प्रणालीवर हजेरी नोंदवणे अनिवार्य असल्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, अद्यापही अनेक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नोंदणी केली नसल्याचे समोर आले. सर्व नियमित, कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक प्रणालीवर ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना नव्या दिल्या आहेत. सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना दररोज बायोमेट्रिक प्रणाली द्वारे उपस्थिती नोंदवावी लागेल. या निर्णयाची तत्काळ अंमल बजावणी न झाल्यास कर्मचाऱ्या चे वेतन थांबवण्यात येईल, असे स्पष्ट आदेश आरोग्य विभागाचे आयुक्त आणि राष्ट्रीय ग्रामीण अभियानचे संचालकांनी दिले आहेत.

## .तर दिलेल्या वेतनाची वसुली

०१ एप्रिलपासून सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे बायोमेट्रिक किंवा फेस रिडिंग हजेरीनुसारच वेतन अदा करण्याच्या सूचना आहेत. त्या व्यतिरिक्त वेतन अदा केल्यास संबंधित लेखा अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना जबाबदार धरत त्यांच्याकडून वेतनाची रक्कम वसूल करण्यात येईल, असा इशारा आरोग्य सेवा उपसंचालकांनी संबंधितांना दिल्या आहेत.

# प्रवेशास प्रक्रियेला पुन्हा एकदा मुदतवाढ मिळण्याची शक्यता


## आरटीईकडे पालकांची पाठ; ७४४ जागा अद्यापही रिक्तच

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांमध्ये राखीव असणाऱ्या २५ टक्के जागांवर जिल्ह्यातील १६५५ बालकांचे शाळांमध्ये प्रवेश निश्चित झाल्याने, प्रवेशाच्या रिक्त जागांवर प्रतीक्षा यादीतील मुलांना संधी देण्यात येत आहे. १ एप्रिलपर्यंत बालकांना प्रवेश घ्यायचे होते. मात्र, ७४४ जागा अद्यापही रिक्त असल्याने ४ एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली होती. परंतु अजूनही पाल्यांचे प्रवेश निश्चित केले नाही. त्यामुळे याला मुदतवाढ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी २५ टक्के ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची पहिल्या सोडतील प्रवेशाची प्रक्रिया १० मार्चपर्यंत राबवण्यात आली. दरम्यान, निवड यादीतील प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १८ मार्चपासून प्रतीक्षा यादीतील टप्पा क्र. १ मधील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू केली. यासाठी प्रतीक्षा यादीतील बालकांच्या पालकांना प्रवेशाबाबतचे




एसएमएस पाठवले आहेत. त्यानुसार प्रवेशास पात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चितीसाठी पडताळणी समितीकडे आवश्यक कागदपत्रे देऊन आपल्या बालकांचे प्रवेश शाळेत जाऊन १८ ते २४ मार्चपर्यंत निश्चित करावयाचे होते. मात्र, पुन्हा प्रतीक्षा यादीतील बालकांना प्रवेशासाठी १ एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली होती. परंतु आपल्या पाल्यांचे प्रवेश घेण्यासाठी पालकांनी पाठ फिरवल्याचे दिसून आले.

# सर्दी, खोकला, तापामुळे युवक,आबालवृद्ध बेजार!
# विषम वातावरण आरोग्यास ठरतेय त्रासदायक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** उन्हाळा सुरू झाला असतानाही गेल्या आठवड्यात तीन चार दिवस अवकाळी पाऊस आणि ढगाळ वातावरण राहिले. तसेच सध्या दिवसा प्रचंड तापमान आणि रात्री थंडीचा जोर आहे. या बदलत्या वातावरणाचा परिणाम आबाल वृद्धांच्या प्रकृतीवर होत आहे. सर्दी, ताप, खोकला आणि अतिसारासारख्या आजारांमुळे रुग्णांचे प्रमाण वाढले आहे. यात लहान मुलांची संख्या जास्त आहे. परिणामी येथील सर्वोपचारसह खासगी रुग्णालयात गर्दी वाढली आहे. लहान मुलांच्या दवाखान्यात तर रुग्णांची प्रतीक्षा यादी वाढत आहे.



या बदलत्या वातावरणात विषाणूजन्य साथीचे आजार डोके वर काढतात. ते रुग्णांच्या थेट श्वसन आणि पोटातील आतड्यावर अटॅक करतात. त्यामुळे सर्दी पडसे, खोकला, डोकेदुखी, उलट्या, जुलाब,मळमळ असा त्रास रुग्णांना जाणवू लागला आहे. यात सर्वच वयोगटातील रुग्ण आहेत. मात्र प्रतिकार शक्ती कमी असलेल्या लहान बालकांना याचा जास्त त्रास होत असल्याने मुलांची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मुले आजारी पडल्यास, डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे आवाहन शहरातील बालरोग तज्ज्ञांनी केले आहे.

## बाहेरचे खाणे टाळा

बाहेरचे खाणे, विशेषतः हॉटेल्स, पाणीपुरी किंवा फूड स्टॉल्सवर तयार केलेले पदार्थ स्वच्छतेच्या बाबतीत अनिश्चित असू शकतात, म्हणून बाहेरचे खाद्यपदार्थ टाळावेत. उन्हात फिरणे टाळा: दिवसभरातील उष्णतेमुळे मुलांचे शरीर जलद डिहायड्रेट होऊ शकते. त्यांना सर्दी, ताप किंवा डिहायड्रेशन होऊ शकते. त्यामुळे मुलांना उन्हात फिरायला पाठवू नये. संतुलित आहार : मुलांचा आहार पोषणतत्त्वांनी समृद्ध असावा. प्रोटीन, व्हिटॅमिन सी, आयरन, आणि फायबर असलेले पदार्थ त्यांच्या आहारात समाविष्ट करा.

# अंबादेवी मंदिरात सामूहिक रामरक्षा स्तोत्र पठण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती**

सध्या चैत्र नवरात्रोत्सव सुरू असून आज शनिवार, ५ एप्रिलला महाअष्टमी आहे. यानिमित्त अमरावतीचे आराध्य दैवत अंबादेवीचे मंदिर विविधरंगी विद्युत रोशनाईने सजले आहे. मंदिरातील दोन्ही कळस, यात्री






निवासावर रोशनाई करण्यात आहे. त्यामुळे मंदिराचे सौंदर्य वाढले आहे. शनिवारी अंबादेवी मंदिरात सामूहिक रामरक्षा स्तोत्र पठण करण्यात आले यात ८० भक्तांनी सहभाग घेतला होता. आज अष्टमी निमित्य होम हवन करण्यात आले

# खुल्या भूखंडधारकांना सुरक्षा कुंपण लावा, अन्यथा दंड भरा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

महापालिका क्षेत्रात सुमारे ७७ हजार खुले भूखंड आहेत. अनेकांनी हे भूखंड गुंतवणूक म्हणून तर काहींनी व्यवसायाच्या दृष्टीने तर काहींनी घर बांधण्यासाठी खरेदी केले आहेत. परंतु, हे खुले भूखंड परिसरात राहणाऱ्या नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहेत. त्यावर मोकाट जनावरे फिरत राहतात. तसेच कचरा, सांडपाणी सोडले जात असल्याने खुल्या भूखंड धारकांनी सुरक्षा कुंपण लावणे अनिवार्य केले. जे कुंपण लावणार नाहीत त्यांना दंड केला जाणार आहे. ज्यावेळी ते विकासाची परवानगी मागण्यासाठी महापालिकेत येतील त्यावेळी त्यांच्याकडून एकाचवेळी शुल्क आकारले जाणार आहे.

मनपाने खुल्या भूखंडांना कुंपण घालण्याचा आदेश एक ते दीड वर्षाआधीच जारी केला आहे. त्यानुसार काहींनी कुंपण घालून भूखंड सुरक्षित केले. मात्र, बहुतेकांचे भूखंड कुंपणाविना आहेत. त्यांच्याकडून दंड वसूल केला जाईल, असा इशारा मनपा प्रशासनाने दिला आहे. अनेक भूखंडधारक बाहेरगावी राहतात. काही नोकरीनिमित्त तर काही निवृत्त झाल्यामुळे त्यांच्या मुलांकडे गेले आहेत. त्यामुळे त्यांना या रिकाम्या भूखंडांकडे लक्ष देण्यास वेळ नाही. मात्र, यामुळे परिसरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात भूखंडावर साचलेल्या कचऱ्यावर पाणी पडून तो सडला की, त्यावर डास तयार होतात. तसेच विविध कीटकही तेथे वाढतात. त्यामुळे कीटकजन्य आजाराची शक्यता बळावते. त्यामुळे अशा भूखंडधारकांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी मनपाकडे स केली. त्यानंतर मनपाने जे भूखंडधारक सुरक्षा कुंपण उभारणार नाही, त्यांना दंड केला जाईल, असा आदेश जारी केला.

# नाल्या बांधताना पाणी तुंबणार नाही याची खबरदारी घ्या : आ. खोडके
# आमदारांनी घेतला बैठकीत नगर रचना विभागाचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती –** नवीन ले-आऊटला मंजुरी देताना ले-आऊटमध्ये मनपाच्या सहायक संचालक नगर रचना विभागाने पाहणी करून नाली बांधकाम करत असताना वाहते पाणी साचणार नाही याचे नियोजन व्यवस्थित करावे, असे स्पष्ट निर्देश आ. संजय खोडके यांनी दिले. सोबतच काम वेगाने व दर्जेदार करण्याची सूचनाही त्यांनी केली.

आ. संजय खोडके, आ. सुलभा खोडके, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी नगररचना विभागाचा आढावा विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे घेण्यात आला. या वेळी मनपा आयुक्तांनी आ. संजय खोडके व आ. सुलभा खोडके यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर आ.खोडके यांनी रिक्त भूखंड, डीपी रोड, शासकीय व



खासगी जागेवरील आरक्षणाबाबत मनपाला योग्य कारवाई करण्याचे निर्देश दिले.त्याचप्रमाणे मालमत्ता कर, ले-आऊट, नाली व रस्त्याचे बांधकाम, बांधकाम परवानगीबाबत सविस्तर चर्चा करून संबंधितांना सूचना करण्यात आल्या. या वेळी आमदारांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. नाल्यांचे काम तातडीने पूर्ण करावे. कामाची गती आहे त्यापेक्षा वाढवून नागरिकांना दिलासा द्यावा, असे आमदारांनी सांगितले. या वेळी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहायक संचालक नगर रचना घनश्याम वाघाडे, अधिकारी, कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

# महामानवांच्या जयंतीदिनी मद्यविक्री दुकाने बंद ठेवा

## भीम क्रांती सामाजिक संघटनेची मागणी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५अमरावती–**

विश्वरत्न, संविधान निमति डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी (१४ एप्रिल) देशी-विदेशी मद्य विक्री दुकाने, बिअर बार बंद ठेवण्यात यावे. तसेच अवैध दारूची विक्री या दिवशी होऊ नये, यासाठी कडक कारवाई करावी, या मागणीचे निवेदन भीम क्रांती सामाजिक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फ त मुख्यमंत्र्यांना देण्यात आले.

१४ एप्रिल या दिवशी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती असते. म्हणून या दिवशी जाणीवपूर्वक काही असामाजिक तत्त्वाचे नागरिक दारू पिऊन धिंगाणा घालत वातावरण दूषित करतात. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान विचारांचा अपमान होतो. २ ऑक्टोबरला गांधी जयंती तसेच गांधी सप्ताहच्या दिवशीही प्रशासनाद्वारे राज्यात, शहरात देशी-विदेशी मद्याची दुकाने, बिअर बार बंद केली जातात. त्याचप्रमाणे १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या दिवशीही देशी-विदेशी दारूची दुकाने बंद ठेवण्यात यावी. अवैध व इतर माध्यमातून होणारी दारूची विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, परमिट रूमही बंद ठेवण्याचे आदेश द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. या वेळी गोपाल ढेकेकर, सुनील बनसोड, सरिता खंडारे, सुमित गणवीर, कमळ खंडारे, मंगला वानखडे, वंश मते आदी उपस्थित होते.-

# वाहनचालकांकडून २.४४ कोटींचा ई-चालान दंड वसूल : रक्कम शासन तिजोरीत जमा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

जिल्ह्यातील वाहनचालकांकडे प्रलंबित असलेला ई–चालान दंड वसूल करण्यासाठी ग्रामीण पोलीस दलाकडून १ डिसेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात आली. त्यात मागील ई–चालान अनपेड केसमध्ये १ कोटी ७१ लाख ९९ हजार १०० रुपये व नियमित केसमधून ६१ लाख १९ हजार ५०० रुपये असा एकूण २ कोटी ४४ लाख १८ हजार ६०० रुपये दंड वसूल करण्यात आला. ही रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा करण्यातआली आहे.



तसेच १३८ वाहनचालकांविरुद्ध न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत. दंड न भरल्यास न्यायालयाच्या परवानगीने वाहन जप्त करण्याची मोहीमसुद्धा सुरू करण्यात आली आहे. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांकडून वर्ष २०१९ पासून ई–चालानने दंड आकारण्यात आला. मात्र, लाखो वाहनचालकांनी पोलिसांनी पाठविलेल्या त्या चालानकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे डिसेंबर २०२४ पर्यंत अनपेड चालानची रक्कम तब्बल २५ कोटी २३ लाख रुपयांवर पोहोचली. ४ लाख २४ हजार वाहनचालकांनी अमरावती ग्रामीण वाहतूक पोलिसांनी पाठविलेल्या ई–चालानची रक्कम भरली नाही. त्यामुळे पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी अनपेड दंड वसुलीसाठी विशेष मोहीम राबविली. त्या अंतर्गत ई–चालान दंडप्रलंबित असलेल्या वाहनचालकांच्या रहिवासी पत्त्यावर डोअर टू डोअर नोटीस बजावून दंडाचा भरणा करण्याकरिता वाहतूक पोलीस अंमलदारांचे पथक नेमण्यात आले होते. या विशेष मोहिमेदरम्यान जिल्ह्यामधील सर्व पोलीस ठाण्यांतर्गत प्रलंबित ई–चालान दंडाचा भरणा करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या वाहतूक पोलीस पथकांनी वाहनचालकांना नोटीस बजावून प्रलंबित ई–चालान दंडाचा भरणा करून घेतला, तसेच या कालावधीत नियमित केस करताना जास्तीत जास्त पेड केस करून मागील अनपेड केसचा भरणा करून घेण्यात आला. ही विशेष मोहीम ३० एप्रिलपर्यंत सुरू राहणार आहे.

# महापालिकेच्या स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्राचे यश गौरव माळोदेची शासकीय सेवेत नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

महापालिकेच्या महिला व बाल विकास विभागाद्वारा संचालित स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्रातील गौरव माळोदे याची पीएसआय या पदावर निवड झाली आहे. गौरवने सरळसेवा भरती अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेत यश प्राप्त केले.

महापालिका उपायुक्त नरेंद्र वानखडे यांच्या पुढाकाराने स्पर्धा परीक्षा देणाऱ्या शहरातील गरीब, होतकरु विद्यार्थ्यांकरिता शहराच्या मध्यभागी स्पर्धा परीक्षा ग्रंथालय व अभ्यासिका या केंद्रांची निर्मिती

करण्यात आली आहे. शेकडो विद्यार्थी या केंद्राचा लाभ घेऊन शासकीय सेवेत विविध पदावर रुजू झालेले आहेत. या यशाबद्दल गौरवचे आयुक्त सचिन कलंत्रे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, महिला व बाल विकास अधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी शहर अभियंता ईश्वरानंद पनपालिया, कार्यकारी अभियंता रवींद्र पवार, उपअभियंता सुहास चव्हाण, कार्यशाळा उपअभियंता लक्ष्मण पावडे, स्पर्धा परीक्षा केंद्राचे प्रमुख हिवराळे, महिला व बाल विभ्युगाच्या वरिष्ठ लिपिक प्रियंका चौहान, कनिष्ठ लिपिक अमोल साकुरे, स्पर्धा परीक्षा अभ्यासिका येथील प्रिती बमनोटे, अनुराधा दीक्षित, स्पर्धा परीक्षा अभ्यासिका येथील विद्यार्थी सुजीत वाहिरे, अविनाश विजयकर, रोहन कुशवाह, अशू कुशवाह, सौरभ गेडाम, ओम सावरकर, ऋतिक नाचणकर आदी उपस्थित होते.

# ज्येष्ठ अभनेते मनोज कुमार अनंतात विलीन शासकीय इतमामात अभेनेत्याला निरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांचे काल ४ एप्रिल रोजी पहाटे ३:३० वाजता निधन झाले. आज शनिवारी जुहू येथील पवनहंस स्मशानभूमीत त्यांचे पार्थिव तिरंग्यात गुंडाळून आणण्यात आले. २१ तोफांची सलामी देऊन त्यांचे शासकीय इतमामात सकाळी ११.३० च्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांच्या परिवारासह अमिताभ बच्चन, प्रेम चोप्रा आणि राजपाल यादव असे अनेक कलाकार त्यांना अंतिम निरोप देण्यासाठी येथे पोहोचले.

अभिनेते मनोज 'भरत' कुमार यांना राजकीय सन्मानात निरोप देण्यात आला. यावेळी अभिनेते अमिताभ बच्चन आणि अभिषेक बच्चन, राजपाल यादव, लेखक सलीम खान, अरबाज खान,



संगीतकार–गायक अनु मलिक, अभिनेता–निर्माता झायेद खान, अभिनेता प्रेम चोपड़ा, विंदू दारा सिंह, रजा मुराद, धर्मेंद्र, पूनम ढिल्लों शाहरुख खान जड अंत करणाने उपस्थित होते.

## पंतप्रधानांनी वाहिली श्रद्धांजली

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मनोज कुमार यांच्यासोबतच दोन फोटो शेअर करत शोक व्यक्त केला, त्यांनी त्यांच्या एक्स अकाउंटवर लिहिले, ज्येष्ठ बॉलीवूड अभिनेते आणि चित्रपट निर्माते मनोज कुमारजी यांच्या निधनाची बातमी ऐकून मला खूप दुःख झाले आहे. ते भारतीय चित्रपटसृष्टीचे एक आदर्श होते, त्यांना त्यांच्या देशभक्ती चित्रपटांसाठी ओळखले जाते. मनोज कुमारजींचा सिनेमातून हृदयात राष्ट्रीय अभिमानाची भावना जागृत करायचे. या दुःखाच्या वेळी मी त्यांच्या कुटुंबियांसोबत आणि मित्रांसोबत आहे. ओम शांती.

# टाकरखेडा संभू येथे ६ एप्रिल रोजी मध्यरात्रीनंतर निघते हनुमान सवारी शोभायात्रा

## अतिपुरातन काळापासून परंपरा, राम नवमीच्या दिवशी हजारोंच्या संख्येने येथे भक्त जागतात रात्रभर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५टाकरखेडा संभु**

रामनवमीच्या दिवशी दुपारी बारा वाजता जन्मोत्सवात विडा घेतल्यानंतर मध्यरात्रीला दोन वाजताच्या सुमारास येथिल श्रीराम मठात हनुमानजी सवारी शोभायात्रा काढली जाते, हजारो भक्त या शोभायात्रेत मोठ्या श्रद्धेने सहभागी होतात, पहाटे ४ वाजे पर्यंत हा कार्यक्रम चालतो, ही परंपरा अति पुरातन असून नेमकी कोणत्या वर्षापासून सुरू झाली याचा कुठेही उल्लेख नाही, परंतु आजही वयोवृद्ध पासून तर आजची युवक पिढी या धार्मिक उत्सवाला मानतात व त्यांची श्रद्धा असल्याने रविवारी ६ एप्रिल रोजी हजारोंच्या संख्येत भाविक टाकरखेडा संभू येथे दाखल होणार आहे



पुरातन इतिहास लाभलेला टाकरखेडा संभु येथील श्रीराम मठ आज पंचक्रोशीतच लक्षावधी भाविकांचे श्रद्धास्थान ठरले आहे. देशभरात श्रीराम नवमीचा हा उत्सव दिवसभर साजरा होत असताना मात्र भातकुली तालुक्यातील टाकरखेडा संभु या गावात गावकरी रात्र जागून हा उत्सव मध्यरात्री साजरा करताना , प्रभू श्रीरामाचे असीम भक्त हनुमानजी यांचे वंशातील गोसावी यांच्या कुटुंबातील व्यक्तीची सवारी शोभायात्रा मध्यरात्री दोन वाजता काढली जाते ,या कुटुंबातील सध्या वयोवृद्ध असलेले विठ्ठल भारती यांची तिसरी पिढी त्यांचा नातू विवेक भारती यांच्या सवारीची शोभायात्रा मागील वर्षापासून काढली जात आहे, यापूर्वी त्यांचे वडील त्र्यम्बक भारती यांची सवारी काढली जात होती तर त्यांच्यापूर्वी त्र्यंबक भारती यांचे वडील विठ्ठल भारती यांची सवारी काढली जात होती, त्यांच्याच वंशातील ही चालत आलेली परंपरा अति पुरातन असून नेमके त्यांना देखील हा उत्सव कधी सुरू झाला याची माहिती नाही, आपल्या वयोवृद्ध पूर्वीच आपला उत्तराधिकारी नेमून त्यांना गादी सोपविण्याची परंपरा आता पर्यंत चालत आली आहे. राम नवमीच्या दिवशी मध्यरात्री दोन वाजता च्या सुमारास मठात अतिप्राचीन असलेला हनुमानाचा मुखवटा, त्यांचे कपडे व दोन काठ्या गोसावी वंशातील विडा घेतलेल्या व्यक्तीला परिधान केले जातात. या सवारी चे दर्शन घेण्याकरीता परिसरातील हजारो भाविक भक्तांची या मठात गर्दी उसळते. यादरम्यान तयार केलेला रथ त्यावर राम लक्ष्मन श्रीरामाची मूर्ती व सवारी या पारंपारिक उत्सवाचे मुख्य आकर्षण असते,

### काय आहे मठाचा इतिहास

या श्रीराममठाची स्थापना शंभू माळी या महंताने केल्याचा उल्लेख आढळतो, शंभू माळी च्या स्वप्नात प्रभू श्रीराम आणि लक्ष्मण आले होते, आम्ही मंकरणा आहोत आम्हाला बाहेर काढ भाकरी ,भाजी ,कांदा याचा प्रसाद द्या, अशी इच्छा या देवतांनी शंभू माळी यांच्याकडे स्वप्नात प्रगट केल्यानंतर दुसऱ्या दिवशी या इच्छेची पूर्तता करीत माळकरी यांनी श्रीराम मठाची स्थापना केली होती, असे इतिहास सांगतो, माळी यांनी तेव्हापासून येथे श्रीराम महोत्सवाला प्रारंभ केला होता ही पौराणिक परंपरा आजही कायम आहे,

### ती गादी आजही कायम

शंभू माळी यांनी मठाची स्थापना करतांनाच प्रभू श्रीरामचंद्रासाठी येथे एक गादी ही तयार केली होती.या गादीचे अनेक चमत्कार नागरिकांनी अनुभवल्याची आख्यायिका आहे,आजही या मठात ही गादी अस्तित्वात आहे. त्याला भक्ताच्या म्हणी अनन्यसाधारण महत्त्व आहे. या गादीच्या दर्शनासाठी भाविक येथे येतात.बॉक्स

### मठात १४ महंतांची समाधी

मठाच्या महंताने ब्रह्मचारीव्रत घेणे ही अट आहे. आतापर्यंत या मठाला १४ महंत लाभलेत. त्या सर्वांच्या समाधी मठाच्या परिसरातच आहेत. शिव भारती या महंत च्या निर्वाणानंतर अद्याप पावतो नवीन महंत गादीवर स्थानापन्न झालेले नाहीत. गोसावी कुळानेच आतापर्यंत या मठाचा कारभार सांभाळला आहे.

### तीन बैलगाड्याच्या सहायने २२ गाठिवर बांधलेला रथ

या सवारी शोभायात्रा दरम्यान ६ चाकी रथाला येथे अधिक महत्त्व प्राप्त आहे. या उत्सवा प्रमानेच रथला देखील प्राचीन इतिहास आहे, रथ तयार करण्याची जबाबदारी देखील वानखडे कुटुंबातील सदस्यांची वंशपरंपरागत चालत आलेली प्रथा आहे. त्यांच्या सोबतीला नवरंग मंडळाचे पदाधिकारी सहकार्य करतात. यामध्ये तीन बैलगाडी व त्याला ६ चाक लावून हा रथ तयार केला जातो.रथापर्यंत चालत आलेल्या परंपरेनुसार २२ गाठीवर हा रथ बांधल्या जातो. शोभायात्रा दरम्यान नागरिकांच्या मदतीने रथ ओढल्या जातो.

# डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे 'गट-ब्रेन-ॲक्सिस' विषयावर कार्यशाळा संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ५ अमरावती**

श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय येथील शरिरक्रियाशास्त्र विभागाकडून 'गट–ब्रेन–ॲक्सिस' विषयावर कार्यशाळा प्रसिध्द गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. अमित कविमंडन तसेच अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, एमएमसी निरीक्षक डॉ. पद्माकर सोमवंशी, विभाग प्रमुख डॉ. सुषमा पांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार, दिनांक २६ मार्च २०२५ रोजी गायटॉन हॉल येथे आयोजित केली होती. या कार्यशाळेला महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कडून क्रेडिट पॉईन्ट मंजूर करण्यात आला होता. कार्यशाळेचे प्रमुख वक्ते गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. अमित कविमंडन यांनी आतड्यांच्या आरोग्याचे महत्व आणि त्याचा व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम याविषयी पॉवर पाईन्टच्या माध्यमातून उपस्थितांना प्रबोधन केले. तसेच निरोगी समाज बनण्यासाठी प्रत्येकाला आपल्या सांस्कृतिक आहार सवयींकडे परत येण्यासाठी प्रोत्साहीत केले. अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांनी 'गट–ब्रेन–ॲक्सिस' विषयावर कार्यशाळा आयोजीत केल्याबद्यल फीजिओलॉजि विभागाचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सुरूवातीला मान्यवरांचे हस्ते शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांना अभिवादन करून कार्यशाळेला सुरूवात झाली. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वीतेकरीता डॉ.एस.एम.वावगे, डॉ.एस.एन. निवाणे, डॉ.व्ही.आर. पराते, डॉ.एस.एस.व्यास, डॉ.एन.ए. भुईभार तसेच शिक्षकेत्तर कर्मचा–यांनी कर्तव्य पार पाडले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. प्रियल तोलानी यांनी केले तर आभार डॉ. सुषमा पांडे यांनी मानले.

# शिवदत्त राम मंदिरात श्रीराम जन्मोत्सवानिमित्त कीर्तन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५दर्यापूर**

जुन्या दर्यापुर परिसरातील रेखे वाड्यातील अतिप्राचिन श्री शिवदत्त राम मंदिरामध्ये श्रीराम जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त हभप छाया गजेंद्र पाथरे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.रेखे वाड्यातील श्री शिवदत्त राम मंदिरामध्ये १७८७ पासून अखंड श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा केला जातो. श्रीरामनवमीच्या नऊ दिवसांमध्ये येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यावर्षी सुद्धा श्रीराम जन्मोत्सवानिमित्त



हभप छाया गजेंद्र पाथरे यांचे कीर्तन रविवार, ६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आले आहे. त्यांच्या कीर्तनाला तबल्याची साथ माधवराव रेखे तर हार्मोनियमची साथ अश्विनीकुमार रेखे हे देणार आहेत. श्रीराम भक्तांनी या कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक गणेश पाटील रेखे यांनी केले आहे.

# विद्यापीठात कर्मचाऱ्यांकरिता आरोग्यविषयक जनजागरण कार्यक्रम संपन्न

## राज्याच्या दिशेने डॉक्टरांचे अनेक मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ५ अमरावती**

संत गागे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आरोग्य केंद्र व अमरावती येथील राज्याच्या स्थानिक विकासासाठी संयुक्त विद्यमाने राज्य शासनाच्या दिवसपूर्ती सुरू करण्यासाठी स्थानिक जनजागृती उपक्रम युनिव्हर्सिटी कर्मचा–यांमध्ये अस्तित्त्वात आहे. नंतर अमरावती येथील स्थानिकांच्या डॉक्टरांनी विविध संघटनांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रभारी कुलसचिव तथा नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, स्थानिक स्थानिक डॉ. प्रिती लाहोरे, डॉ. मनिषा म्हस्के, डॉ. आशीष, आरोग्य केंद्र व अधिकारी– डॉ. स्मिता थोरात सीमा होती.

ओरलजी हायनवर मार्गदर्शन करताना डॉ. आशीषकर यांनी दांत व स्वच्छ स्वच्छ ठेवावे, तोंडी बोलतोस



तो सामान्य आहे तो शोध लावावे, गलेमध्ये याविषयी सविस्तर माहिती दिली. मुख कॅन्सरचे विविध प्रकार स्लाईडच्या

डॉ. प्रिती लठ्ठपणा कसा शोधून काढला, त्याचे आरोग्यावर परिणाम होणार, लठ्ठपणा स्थितीत होतो, लाहोरे नियंत्रण ठेवावे, कारण लठ्ठपणा शांतता कशी करावी, मार्गदर्शन केले पाहिजे. तसेच उपस्थितांनी विचार केला, शंकांचे योग्यशी निरसनही केले. कान, नाक, घसा व्हिडिओ डॉ. मनिषा स्केले यांनी थोयराईड सीमांम्हे म्हैसाला सांगतो कारणे, थोयरायड ग्रंथी, प्रथमचे निदान व उपचारं आधारे विस्तृत मार्गदर्शन केले.

नसा संचालक डॉ. अजय लाड यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात यांनी अस्तित्त्वात्य कार्यक्रमाची भूमिका विषद केली व पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रवास व आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नादुरकर यांनी केले. कार्यक्रमाला विद्यापीठातील सर्व अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठएले उपस्थित होते. कार्यक्रमाचे श्री केंद्रीय समाजसेवी अधीक्षक श्री किशोर धर्माळे, अजय वांखडे तसेच आरोग्य सचिन बाळापुरे यांनी अथक परिश्रम घेतले.

# नागपुरातून हज यात्रेकरूंचे पहिले उड्डाण २३ मे रोजी होणार

## हज कमिटी ऑफ इंडियाने प्रसिद्ध केले हजयात्रेचे शेड्यूल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नागपूर**

यावर्षी २३ मे पासून नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंतरराष्ट्रीय विमानतळाहून हज यात्रेकरूंसाठी उड्डाण सुरू करण्यात आले आहे. हज कमिटी ऑफ इंडियाने हजयात्रा २०२५ साठी जाण्याचा व परतण्याचा शेड्यूल प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार २३ मे रोजी रात्री ११:२० वाजता विमानतळाहून पहिला यात्रेकरूंचा जत्था हजसाठी रवाना होणार आहे.



नागपुरातून जेद्दाह सौदी अरबसाठी हज यात्रेकरूंचे ५ विमान आहे. शेवटचे विमान ३० मे रोजी रात्री ३:२५ वाजताचे आहे. हज कमिटी ऑफ इंडियाच्या सूत्रांकडून सांगण्यात आले की, या शेड्यूलमध्ये काही बदल होण्याची शक्यता आहे. केंद्रीय हज समितीने प्रसिद्ध केलेल्या शेड्यूलनुसार ३० जूनपासून हज यात्रेकरूंचा परतीचा प्रवास सुरू होईल. यंदा महाराष्ट्रातून किमान १५ हजार यात्रेकरू हजला जाणार आहेत. यातील नागपूर इम्बार्केशन पॉइंटहून २ हजार हजयात्री रवाना होणार आहे. त्यासाठी नागपूर हज हाउसमध्ये २१ मे पासून हज यात्रेकरून रिपोर्टिंग करावी लागणार आहे.

### नागपूरहून हजसाठी विमानांचे शेड्यूल

| विमान | तिथी | उड्डाणाचा वेळ |
|---|---|---|
| १- एक्सवाय-८२२२ | २३ मे | रात्री ११:१० वाजता |
| २ - एक्सवाय ८२२८ | २५ मे | रात्री ११:२० वाजता. |
| ३-एक्सवाय ८१५६ | २६ मे | रात्री ११:२० वाजता. |
| ४ - एक्सवाय ८२३४ | २७ मे | रात्री ११:२० वाजता. |
| ५ - एक्सवाय ८२४० | ३० मे | रात्री ३:२५ वाजता. |

**फ्लायनास एअरलाइन्सने भरणार उड्डाण**

केंद्रीय हज समितीनुसार हज यात्रेकरूंची रवानगी व परत येण्याचा कार्यक्रमांतर्गत फ्लायनास एअरलाइनच्या माध्यमातून हज यात्रेकरूंना विमान सेवा प्रदान करण्यात येणार आहे. फ्लायनास एअरलाइनच्या विमानाची प्रवासी क्षमता ४३० आहे.

# वसंत चौक गोळीबार प्रकरणात तीन आरोपी अटकेत

## हल्लेखोरांनी कुणाच्या सांगण्यावरून गोळीबार केला याचा तपास सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

स्थानिक वसंत चौकस्थित जयभोले केंद्र या पान मटेरियल विक्रीच्या दुकानावर देशी कट्ट्यातून गोळीबार करण्यात आला. यात कुणीही जखमी झाले नसले तरी रात्री ८ वाजेच्या सुमारास मुख्य व गजबजलेल्या बाजारपेठेत गोळी चालल्याने मोठी खळबळ उडाली आहे. अज्ञात तीन हल्लेखोरांनी त्या दुकानाची तोडफोड करून पळ काढला.मात्र पोलिसांनी अवघ्या काही तासांतच तीन



आरोपींना अटक केली असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

मो.आसिफ नूर मोहम्मद वय २६ रा. बडनेरा,अंकुश राजेंद्र शेंडे वय २७ रा.चांदुर रेल्वे व अब्दुल शकील अब्दुल सत्तार वय ४२ रा.चांदुर रेल्वे असे अटक करण्यात आलेल्या आरोपींचे नावे असून पोलिसांनी आरोपीं जवळून एक देशी कट्टा व मो. जप्त केला आहे.बेलोरा टी पॉईन्ट जवळून अकोला रोड येथून या तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली.हे आरोपी पळून जाण्याचा तयारीत असतांना पोलिसांनी त्यांचा पाठलाग केला व त्यांना ताब्यात घेतले.या प्रकरणात आता पोलिसांनी विक्की मंगलानी व आरोपी यांचा कसून तपास सुरू केला आहे.आरोपींनी कुणाच्या सांगण्यावरून गोळीबार केला विक्की मंगलानी याला आरोपी का विचारत होते आहे.हल्लेखोरांनी कुणाच्या सांगण्यावरून गोळीबार केला याचाही तपास पोलीस करत आहे.सदरची कार्यवाही पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी साहेब, अमरावती शहर, पोलीस उपायुक्त परीमंडळ २ गणेश शिंदे स.पो.आ. राजापेठ विभाग जयदत्त भंवर वरिष्ठ पोलीस निरिक्षक मनोहर कोटनाके, पोलीस निरिक्षक (गुन्हे) विजया पंधरे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि रंगराव जाधव पोउपनि शशिकांत चिपडे, पो.हे.कॉ. मलिक अहेमद पोहेकों घनशाम यादव पोहेकों दिपक श्रीवास नापोकों प्रमोद हरणे प्रदीप राठोड, पो.कॉ पंकज अंभोरे पो कॉ आकाश इंगोले पोकों मंगेश यांनी केली आहे.

# उद्याला 'आर्ट ऑफ लिव्हिंग' तर्फे दुर्गा होम, रामरक्षा स्तोत्र कार्यक्रम

## रामनवमीनिमित्त भानखेडा येथील आश्रमात आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

'आर्ट ऑफ लिव्हिंग' अमरावती परिवारच्या वतीने चैत्र नवरात्र व श्रीराम नवमीच्या निमित्ताने ६ एप्रिल रोजी आर्ट ऑफ लिव्हिंग आश्रम भानखेडा येथे सायंकाळी ५.३० वाजता गुरुपूजा, श्री दुर्गा होम, श्री राम रक्षा स्त्रोत, ललिता सहस्त्रनाम, नंतर महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

या पूजेला बेंगलोर आश्रम येथील पंडित येणार असून, श्री दुर्गा होम पूजेला अमरावती शहरातील नागरिकांनी तसेच आर्ट ऑफ लिव्हिंग परिवारातील सर्वांनी उपस्थित राहून पूजेचा लाभ घेण्याचे आवाहन आर्ट ऑफ लिव्हिंग अमरावतीच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच दुर्गा होम यजमान व संकल्पाकरिता दिलेल्या मोबाइल क्रमांकावर आयोजन समितीशी संपर्क करता येईल, असेही कळविण्यात आले आहे.

# महसूल मंत्रालयाकडून विद्यार्थ्यांना थंड पेय देण्याचे आदेश पण पैसा कोण देणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

उन्हाळा वाढल्याने हवामान खात्याच्या इशाऱ्यानुसार वेळेचे नियोजन करा, _वर्गखोल्या थंड ठेवा,प्रथमोपचार आणि पेयजलाची सोय करा, पोषण आहारात मुलांना सरबत, ताक, ओआरएसचे पाकीट द्या, आदी सूचना महसूल मंत्रालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने सर्व शाळांना केल्या आहेत. मात्र यासाठी पैसा कोठून आणायचा, हा प्रश्न शाळेच्या मुख्याध्यापकांसमोर आहे.पोषण आहाराचे किंवा शाळांना साहित्यखरेदीसाठी मिळणारे अनुदान वेळेत मिळत नसताना आता या गोष्टींच्या खरेदीसाठी पैसा कोठून आणायचा, असा सवाल विचारला जात आहे.



**आहारासाठीचे अनुदान वेळेवर मिळत नाही?**

मिळालेल्या माहितीनुसार, शाळेत मिळणाऱ्या पोषण आहाराचे अनुदान वेळेवर मिळत नाही. या वर्षीचे अनुदान अद्याप शाळांकडे आले नाही. बऱ्याच शाळांमध्ये तांदूळ नव्हते, जे दोन दिवसांपूर्वी देण्यात आले. अनुदान वेळेत मिळत नसल्याने हा खर्च शिक्षक, मुख्याध्यापकांना करावा लागतो. त्यामुळे नव्या आदेशानुसार गोष्टींसाठी पैसा आणायचा कोठून, हा प्रश्न आहे.

**ही अडचण कोण समजून घेणार?**

उन्हाचा तडाखा लक्षात घेता पूर्वीप्रमाणे एप्रिलच्या सुरुवातीच्या काळात परीक्षा आटोपणे चांगले होते. मात्र शासनाने पहिली ते नववीपर्यंतच्या परीक्षा पुढे ढकलल्या. या परीक्षा २५ एप्रिलपर्यंत चालणार आहेत. यानंतर पाच दिवसांत पेपर तपासून १ मे रोजी निकालही द्यायचा आहे. हे कसे साध्य होणार आहे, याचा विचार सरकारने केला नाही. आता हा आदेश थोपवून सरकारने शाळांना खर्चात पाडले आहे.

पैसे आणायचे कोठून?शासनाने दिलेले आदेश योग्य असले तरी या सर्व गोष्टी पुरविण्यासाठी पैसा कोठून आणायचा, हा प्रश्न आहे.

अनेक शाळांमध्ये वीज बिल न भरल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे. अशा वेळी पंखे, कुलर चालवायचे कसे? बऱ्याच शाळांमध्ये पंखेसुद्धा नाहीत. रोजचे इंधन, भाजीपाला अनुदान चार-चार महिने येत नाही. या वर्षीचे शाळा संयुक्त अनुदान अजूनही मिळालेले नाही. वर्षभर शिक्षकांनाच खर्च करावा लागतो. वरून उन्हाळ्याचा खर्च. हा सर्व खर्च करायचा कोठून?

**राजेश सावरकर,**
**राज्य प्रसिध्दी प्रमुख,**
**महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती**

साहित्य खरेदीसाठी लहान शाळांना ५००० व मोठ्या शाळांना १२,५०० रुपये शाळा संयुक्त अनुदान मिळते, जे यावर्षी मिळाले नाही. एखाद्या शाळेत २५ ते ३० मुले असतील, त्यांना जमेल; पण शंभर, दोनशे, अडीचशे विद्यार्थी असलेल्या शाळांना एवढा खर्च कसा करावा, हा प्रश्न आहे.

पोषण आहारात ताक, सरबत : पोषण आहारात ताक, सरबत यांसह संत्री, टरबूज, खरबूज, द्राक्षे, अननस, काकडी, कोथिंबीर, स्थानिक फळे, भाज्या व उच्च प्रमाणात पाणी असलेली फळे द्यावीत. दुपारच्या सत्रात खेळ नको :सकाळच्या वेळी कवायती, खेळ आटोपावेत. दुपारी मैदानी खेळ व इतर हालचाली टाळाव्यात. बाहेर मैदानात वर्ग घेऊ नयेत. मुलांना उष्णतेच्या लाटेपासून बचावासाठी शिक्षित करावे.

**काय आहेत आदेश?**

शाळेच्या वेळेचे नियोजन करा: वाढत्या उन्हामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेता शाळेची वेळ व वेळापत्रकात सुसूत्रता आणण्यासाठी सकाळच्या सत्रात शाळा भरवाव्या. प्राथमिकची वेळ सकाळी ७ ते ११:१५ आणि माध्यमिकच्या वेळी सकाळी ७ ते ११:४५ पर्यंत करावी.

# अवकाळी संपला! आता उष्णतेचा इशारा

## हवामान खात्याने उष्णतेचा दिला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नागपूर**

विदर्भात तापमान ऐन मार्च महिन्यात नवे उच्चांक गाठत असतानाच अवकाळी पावसामुळे पारा तब्बल सहा ते आठ अंश सेल्सिअसने खाली आला. आता पुन्हा एकदा हवामान खात्याने उष्णतेचा इशारा दिला आहे.राज्यातील तापमानात सातत्याने चढउतार होत आहे. कधी नाही ते यावर्षी उन्हाळा लवकर सुरू झाला. मार्च महिना संपण्याआतच उष्णतेच्या दोन लाटांचा इशारा हवामान खात्याकडून दिला गेला.



राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद विदर्भात होत गेली आणि तापमानाचे नवनवे उच्चांक मार्च महिन्यातच नोंदवले गेले. अनेक शहरांमध्ये तापमान ४२ अंश सेल्सिअसच्यापलीकडे गेले. तर काही शहरांमध्ये ते ४१ आणि ४० अंशाच्यापलीकडे गेले. तापमानात सातत्याने वाढ होत असतानाच भारतीय हवामान खात्याने वादळी वाऱ्यासह आणि विजांच्या कडकटाटासह मुसळधार पावसाचा इशारा दिला. तब्बल तीन दिवस विदर्भासह राज्यातील इतर भागांना सुद्धा अवकाळीचा तडाखा बसला. काढणीला आलेली पीके अक्षरश: ओली झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. तर बाजारात विक्रीसाठी आलेले धान्य देखील ओले झाल्यामुळे व्यापाऱ्यांचे नुकसान झाले. दरम्यान आता पुन्हा एकदा हवामानखात्याने पाच ते आठ एप्रीलदरम्यान वेगवेगळ्या भागात उष्णता वाढू शकते, असा इशारा दिला आहे. यात महाराष्ट्रातील काही शहरांचा समावेश आहे.

मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर, सांगली, सोलापूर आणि लातूर या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. दरम्यानच्या काळात तीन दिवस राज्यातील बहूतांश भागात वादळी वाऱ्यासह आणि विजांच्या कडकडाटासह पावसाच्या मध्यम ते मुसळधार सरी कोसळल्याने आणि आता तापमानाचा पारा वाढल्याने उकाड्यात प्रचंड वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वी भारतीय हवामान खात्याच्या अधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेऊन एप्रिल ते जून या कालावधीत देशातील बहूतांश भागात कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता वर्तवली आहे. महाराष्ट्राच्या बहुतांश भागात तीव्र उन्हाळा असणार आहे. तर, राज्यात उष्णतेच्या तीव्र लाटांचा इशारा देखील हवामान खात्याने दिला आहे.

# कुख्यात आंतरराज्यीय चंदनचोर टोळीचा म्होरक्या गजाआड

## गुन्हे शाखा यूनिट क्र. १ ची धडाकेबाज कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

काही अज्ञात इसमांनी मा. जिल्हा व सत्रन्यायाधिश यांच निवासस्थान, कांतानगर, अमरावती येथील कम्पाउंडचे आंत प्रवेश करुन निवासस्थानाचे मागचे बाजुस असलेले ५ वर्ष वयाचे चंदनाचे २ झाड, किंमत अंदाजे २०,०००/-रु. चे चोरुन नेले. सदरची चोरी ही धाडसपुर्ण गंभीर होती तसेच पोलीस आयुक्त, अमरावती शहर तसेच वरिष्ठांनी घटनेचे गांभीर्य पाहून घटनास्थळाला भेटी दिल्या तसेच सदर चोरीचा गुन्हा उघड करण्याकरीता ५ टीम गठीत केल्या व प्राधान्याने गुन्हा उघड करण्यासाठी आदेशीत करण्यात आले होते या प्रकरणात पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे.

इसराईल खान इस्माईल खान गोलवाल, झाकीर खान शेर खान असे अटकेतील आरोपींचे नावे असून उर्वरित दोन आरोपी फरार आहेत.गुन्हे शाखा, युनिट क्रमांक ०१ चे अधिकारी व अंमलदार हे सदर गुन्हाचा संमातर तपास करत असताना त्यांनी गुन्हाचे घटनास्थळी भेट देवून बारकाईने पाहणी केली. गुप्त बातमीदार नेमूण गुन्हाबाबत पाठपुरावा करुन गोपनिय माहिती संकलीत केली असता महाराष्ट व इतर राज्यात चंदन चोरीचे गुन्हे करणारी टोळी हि जंजाळा, घाटंब्री, नानेगाव ता. सिल्लोड जि छत्रपती संभाजी नगर व ग्राम कठोरा बाजार ता.



भोकरदन जि. जालना या भागातील असू शकतात अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने सदर जिल्हात गुप्तबातमीदार नेमण्यात आले परंतू सदर गावातील बहुतांश लोक चंदनचोरीचे गुन्हे करण्याचे सवईचे असून सदर आरोपी यांना त्यांचे गावातून अटक करते वेळी स्थानीक लोक हे प्रतीकार करण्याचे सवईचे आहेत. तसेच पोलीस त्या भागात गेल्यास आरोपी हे अजिठां लेण्याचे जंगल व द-या खो-यात लपण्याचे सवईचे आहेत अश्या परिस्थीत सदर आरोपीतांना ताब्यात घेवून अटक करणे हे कठीन कार्य होते.सदर आरोपीतांबाबत गुप्त बातमीदार व तांत्रिक माहीतीच्या आधारे माहीती प्राप्त झाली की आरोपी नामे इसराईल खॉ रा. जंजाळा पो. स्टे अंजीठा छत्रपती संभाजी नगर याने त्याचे इतर साथीदारचे मदतीने सदरचा गुन्हा केल्याची माहीती प्राप्त झाल्याने गुन्हे शाखा यनीट कं ०१ चे अधिकारी व अमंलदार यानी सातत्याने आरोपी बाबत माहीती प्राप्त केली तसेच सदर भागात जावून माहीती घेतली असता त्याना जंजाळा गावातून ताब्यात घेणे हे अडचणीचे असल्याने सदर गावाचा बाजार हा ग्राम अंबर्ड असल्याने व बहुतांश लोक जंजाळा येथन अंबाई येथे बाजारात येत असल्याची माहिती मिळताच गुन्हे शाखा यनीट कं. ०१ चे अधिकारी व अमंलदार यानी सकाळ पासून अंबाई बाजारात वेशांतर करून सापळा रचला असता आरोपी इसराईल खान हा अंबाई बाजारात आल्याने त्याला शिताफीने स्थानीक लोकांचे गर्दीतून ताब्यात घेवून संबधीत पोलीस स्टेशनला आणून गुन्हा संबंधाने बारकाईन विचारपूस केली असता त्याने सदर गुन्हा त्याचे इतर साथीदार यांचे मदतीने केल्याचे प्राथमीक तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, नवीनचंद्र रेड्डी,पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय) कल्पना बारवकर मॅडम, पोलीस उपआयुक्त सागर पाटील सा. (परिमंडळ-०१), मा. सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे विभाग) शिवाजी बचाटे, सहायक पोलीस आयुक्त (गाडगेनगर विभाग) अरुण बा. पाटील सा. यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरखनाथ जाधव, सपोनि मनीष वाकोडे, पो.उपनि. प्रकाश झोपाटे, पोहवा सतीष देशमूख, पोहवा फिरोज खान, पो.हे.कॉ. सचिन बहाळे, पो.हे.कॉ. अलीमउददीन खतीब, नाईक पोलीस अमंलदार नाझीम सैयद, विकास गुढधे, सचिन भोयर, पोलीस अमलदार सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक-अशोक खंगार, किशोर खेंगरे, गुन्हे शाखा युनिट कंमाक -०१ यांनी तसेच सायबर पो.स्टे. चे स.पो. नि. अनिकेत कासार व पो.हे.कॉ. निखील माहोरे, म.पो.कॉ. सुषमा आठवले व पो.कॉ. अनिक्त वानखडे यांनी केलेली आहे.